सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरुवार, दि. ४ डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २३८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मुंबईच्या पोटात वाहतुकीचं नवं जाळं!

## भुयारी मेट्रोच्या खाली बांधणार रस्ता; अटल सेतू, कोस्टल रोड जोडणार

**मुंबई :** मुंबई आणि उपनगरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रशासनाकडून अनेक उपाययोजना हाती घेण्यात येत आहेत. भुयारी रस्ते, मेट्रो तर मुंबई लोकलही अपग्रेड करण्यात येत आहेत. वाढती वाहतूक मागणी आणि वाहतुकीच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने एमएमआरडीएने ऑरेंज गेट ते मरीन ड्राइव्ह या मुंबई शहरातील भूमिगत रस्त्याचे बांधकाम हाती घेतले आहे.

आज बुधवारी ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह प्रकल्पातील टीबीएम लॉन्चिंगचा महत्त्वाचा टप्पा पार पडणार आहे. त्याआधी काय आहे हा प्रकल्प, जाणून घेऊयात सविस्तर. ऑरेंज गेट ते मरीन ड्राइव्ह भूमिगत रस्त्याच्या

**प्रकल्पाचे मुख्य फायदे**

**मुंबईतील पूर्व-पश्चिम उपनगरे आणि नवी मुंबई या भुयारी मार्गाद्वारे जोडली जाणार आहे. त्यामुळं प्रवासाचा वेळ १५-२० मिनिटांनी कमी होईल. तसंच, इंधनाची बचतदेखील होणार आहे. या बोगद्यामुळं ध्वनी आणि वायू प्रदूषण कमी होण्यास मदत होईल.**

प्रकल्पाचा खर्च ८०५६ कोटी इतका असून पूर्णत्वाचा कालावधी ५४ महिने असणार आहे. तसंच, या प्रकल्पाची एकूण लांबी ९.९६ किमी आहे. यामध्ये जवळपास ७ किमी भुयारी मार्ग आहे.

प्रत्येक बोगद्यात ३.२ मीटर रुंदीचे २ पदरी रस्ते, १ पदरी आपत्कालीन रस्ता असेल. तसंच, दोन्ही बोगद्यांमध्ये वेगमर्यादा ८० किमी/तास असेल. हा बोगदा कोस्टल रोड आणि अटल सेतूसारख्या पायाभूत सुविधा प्रकल्पांशी जोडला जाणार आहे. तसंच, हा भारतातील पहिला शहरी बोगदा प्रकल्प असून तो घनदाट लोकवस्ती असलेल्या भागाखालून जाईल. उदा. मध्य, पश्चिम रेल्वे आणि मुंबई मेट्रो लाईन ३ च्या ५० मी खालून जातो.



मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह शहरी भुयारी मार्ग प्रकल्पासाठी 'टनेल बोरिंग मशीन'चा शुभारंभ करण्यात आला. यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री मंगलप्रभात लोढा व इतर मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात...

### अयोध्येत भव्य राम मंदिर संग्रहालय होणार

**अयोध्या :** अयोध्येत लवकरच भव्य राम मंदिर संग्रहालय होणारेय. उत्तर प्रदेशातील योगी सरकारनं हे भव्य संग्रहालय बांधण्याचा निर्णय घेतलाय. यासाठी योगी सरकारकडून ५२ एकर जमीन देण्यात आल्याची माहिती आहे. याचे बांधकाम टाटा कंपनी करणार आहे.

### ९ फेब्रुवारीला भराडी देवीची जत्रा

**आंगणेवाडी :** रलाखो भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या आंगणेवाडीच्या श्री. देवी भराडी आईच्या जत्रोत्सवाची तारीख निश्चित झाली आहे. सोमवार दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ रोजी आंगणेवाडीच्या भराडी देवीचा जत्रोत्सव होणार असून याबाबतची अधिकृत माहिती आंगणे कुटुंबियांकडून देण्यात आली आहे.

### नगराध्यक्षावर गुन्हा दाखल

**येवला :** येवला नगरपालिका निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशीच मतदारांना प्रलोभन देऊन त्यांचे मत विकत घेण्याचा एक अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शिवसेना (शिंदे गट) पुरस्कृत नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराशी संबंधित असलेल्या एका कर्मचाऱ्याला पैसे वाटप करताना रंगेहात पकडले.

### देवदर्शनाहून येताना अपघात; पती-पत्नी ठार

**बारामती :** तेलंगणा येथील तिरुपती बालाजीचे दर्शन घेऊन परतणाऱ्या एका कुटुंबावर काळाने घाला घातला. राष्ट्रीय महामार्गावर आज पहाटे अंदाजे ४:३० च्या सुमारास झालेल्या एका भीषण अपघातात पती-पत्नीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. बारामती शहरातील शिवाजीनगर परिसरात राहणारे जगताप कुटुंब देवदर्शनासाठी तेलंगणा येथील तिरुपती बालाजीला गेले होते.

# मुख्यमंत्री-संजय राऊत यांच्यात २० मिनिटे चर्चा

**मुंबई :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांच्यात



भेट झाली असल्याची माहिती समोर आली आहे. मुंबईतल्या एका खाजगी सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांची भेट झाली. राजकीय दृष्टीने परस्परांवर टीका-टिप्पणी करणारे हे दोन्ही नेत्यांनी संवाद साधला. दोन्ही नेत्यांमध्ये २० मिनिटे चर्चा झाली असल्याची माहिती समोर आली आहे.

नगर परिषद, नगर पंचायत निवडणुकीत भाजप आणि शिवसेना शिंदे गटातील वादावादी समोर आली. त्यामुळे महायुतीमध्ये फारसं आलबेल नसल्याची चर्चा सुरू झाली होती. राज्यात भाजपसोबत असलेल्या धुसफूसीचा मुद्दा दिल्लीतही पोहचला. एकनाथ शिंदे यांनी अमित शाह यांची भेट घेतली होती. त्यानंतर आता संजय राऊत आणि देवेंद्र फडणवीस यांची भेट झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा सचिव राजेश नार्वेकर यांच्या मुलाचा विवाह सोहळा पार पडला. आयएएस अधिकारी नार्वेकर हे संजय राऊत यांचे व्याही आहेत. त्यामुळे कौटुंबिक कार्यक्रम म्हणून संजय राऊत कुटुंबासह या विवाहाला उपस्थित होते. तर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील विवाह सोहळ्याला उपस्थित राहत नव दाम्पत्याला शुभेच्छा दिल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेना नेते आणि खासदार संजय राऊत यांच्यात २० मिनिटं चर्चा झाली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संजय राऊत यांच्या तब्येतीबाबत विचारपूस करत उपचारांची माहिती घेतली. या विवाह सोहळ्याच्या कार्यक्रमात राज्याचे मंत्री आशिष शेलारदेखील उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संजय राऊत यांच्यासोबत आशिष शेलार यांनीही संवाद साधला.

# नेत्यांना काय वाटते यापेक्षा कायदा महत्त्वाचा

## भाजपसह विरोधकांच्या डोळ्यात राज्य निवडणूक आयोगाचे झणझणीत अंजन

**नवी दिल्ली :** नगरपालिका आणि नगर परिषद निवडणुकीतील गोंधळावरून राजकीय पक्ष संतापले आहेत. काल मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २१ डिसेंबर रोजी निकाल जाहीर करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर राजकीय नेत्यांच्या संतप्त प्रतिक्रिया आल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूक आयोगावर नाराजी व्यक्त केली. तर इतर नेत्यांनी सुद्धा आयोगावर चिखलफेक केली. यावर आता निवडणूक आयोगाने भूमिका मांडली आहे. राजकीय नेत्यांना काय वाटते यापेक्षा कायदा काय सांगतो हे महत्वाचे असा टोला राज्य निवडणूक आयोगाने लगावला आहे. कायद्यानुसार आयोगाचे काम चालते असे आयोगाने सुनावले आहे.

बऱ्याच वर्षानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला मुहूर्त लागला. पण बोगस मतदार आणि इतर कारणांमुळे विरोधकांनी निवडणूक आयोगाला टार्गेट केले. हे आरोप होत असतान ओबीसी आरक्षण आणि ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्याप्रकरणी निवडणूक आयोगाला सुप्रीम चपराक बसली.

या सर्व प्रकरणातून बाहेर पडण्याचा प्रयत्न निवडणूक आयोग करत होता. नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुका एकाच टप्प्यात घेण्याचे आयोगाने ठरवले होते. पण जिल्हा न्यायालयात अनेक उमेदवारांनी धाव घेतल्याने २४ ठिकाणच्या निवडणुकांचा सुधारीत कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला. २० डिसेंबर रोजी निवडणुका जाहीर झाल्या. पण सर्व नगरपालिका आणि नगरपरिषदांच्या निवडणूक निकाल एकाच दिवशी लावण्यात यावा अशी विनंती करणारी याचिका हायकोर्टात दाखल झाली. नागपूर खंडपीठाने ही विनंती मान्य करत २ डिसेंबर रोजीचा निकाल जाहीर न करण्याचा निकाल दिला.

आता २१ डिसेंबर रोजी निकाल येईल. तर मंत्री हसन मुश्रीफ यांनी नागपूर खंडपीठाचा निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात येणार असल्याचा दावा केला. त्यामुळे काल ज्या ठिकाणी मतदान झाले. तिथला निकाल लवकर लागण्याची शक्यता त्यांनी वर्तवली.

# ४ लाख ३३ हजार व्यक्तींची वारंवार नोंदणी

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीसाठीच्या मतदार यादीसंदर्भात धक्कादायक माहिती समोर आली आहे. मुंबईच्या मतदार यादीत दुबारच नव्हे तर १०३ बार ४ व्यक्तींची नाव असलेले मतदार आहेत. मुंबईत तब्बल ४ लाख ३३ हजार व्यक्तींची नावे मतदार म्हणून एकापेक्षा अधिक वेळा नोंदवली असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. दुबार मतदारांची आता फोटोसहित यादी पालिकेकडे प्राप्त झाल्याने ऑफिसमध्ये बसून दुबार मतदारांवर काम केले जाणार आहे. ४ लाख ३३ हजार व्यक्तींची नावे वारंवार नोंदवली गेल्यानं अशया डुप्लीकेट मतदारांची संख्या सुमारे ११ लाखांवर गेली आहे. वार्डमध्ये दुबार मतदार आहे की नाही हे फोटोग्राफ मतदार यादी टॅली करून वॉर्ड मध्ये अधिकारी कर्मचारी पाहणार आहेत. १० डिसेंबर पर्यंत पालिकेचे कर्मचारी बीएलओ कोणाच्याही घरी जाणार नाहीत. सध्या १० डिसेंबर पर्यंत दुबार मतदारांचे परिशिष्ट १ भरून घेतले जाणार नाही. मतदान केंद्र निहाय यादी २२ डिसेंबर ला जाहीर करण्यात येणार आहे.

**डुप्लीकेट मतदारांची संख्या ११ लाखांवर**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादीवर विरोधी पक्षांनी अनेक प्रश्न उपस्थित केले होते. या प्रश्नांना उत्तर देत प्रारुप मतदार यादीतील संभाव्य दुबार मतदारांची वार्डप्रमाणे आकडेवारी समोर आली असून ११ लाखांहून अधिक दुबार मतदार असल्याचे समोर आलं आहे. मुंबई महानगरपालिकेने प्रसारित केलेल्या यादीत ११,०१,५०५ एवढी दुबार नावे आहेत. एस. वार्डमध्ये सर्वाधिक दुबार मतदार असून येथे ६९५०० दुबार मतदारांची संख्या नोंद झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. तर,बी वार्डमध्ये सर्वात कमी दुबार मतदारांची आकडेवारी असून बी वार्ड मध्ये ८,३९८ दुबार मतदार आहेत.

# आरोपी शीतल तेजवानीला अटक

**पुणे :** येथील मुंढव्यातील ४० एकर जमीन घोटाळाप्रकरणातील आरोपी शीतल तेजवानीला पुणे पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणात शीतल तेजवानी मुख्य आरोपी असून तिची चौकशी देखील करण्यात आली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीसाठी ही जमीन खरेदी करण्यात आली होती. त्यामध्ये, प्रकरणातील तपासाचा वेग वाढवल्यानंतर पोलिसांनी मुख्य सुत्रधार म्हणून शीतल तेजवानीची याआधी दोन वेळा चौकशी केली होती. चौकशीत उघड झालेल्या बाबींवरून तिचा थेट सहभाग असल्याचे स्पष्ट झाल्यावर अखेर अटकेची कारवाई करण्यात आली.

पुणे जमीन घोटाळा प्रकरणातील दाखल झालेला गुन्हा रद्द करण्यासाठी शीतल तेजवानीने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर आणि न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर याबाबत सुनावणी देखील झाली. मीडिया रिपोर्ट्समुळं आपणास लक्ष्य केलं जात असल्याचा दावा तेजवानीने याचिकेत केला होता. एफआयआर मीडिया रिपोर्टवर गुन्हा दाखल केला असून मीडियात फरार घोषित करण्यात आल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला होता.



**पुण्यातील ३०० कोटींच्या जमीन घोटाळा गैरव्यवहारात कारवाई**

दुसऱ्या जमिनीप्रकरणी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून तेजवानीची उपस्थिती आवश्यक असल्याचा युक्तिवाद देखील वकिलांनी केला होता. मुंढवा जमीन गैरव्यवहाराबद्दल आधी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत येणाऱ्या बावधन पोलीस ठाण्यात दिग्वीजय पाटील, शीतल मेजवानी आणि रविंद्र तारु यांच्या विरोधात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर, पुणे पोलिसांनी देखील यात उडी घेत नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल केला होता. आता, शीतल तेजवानीला अटक करण्यात आली आहे.

**१८०० कोटींची जमीन केवळ ३०० कोटींमध्ये खरेदी**

पुण्यात मुंढवा येथील १८०० कोटींची जमीन पार्थ पवारांच्या कंपनीने केवळ ३०० कोटींमध्ये घेतली तसंच यासाठी स्टँप ड्युटी म्हणून केवळ ५०० रूपये मोजल्याचा आरोप करण्यात आला होता. महत्वाचं म्हणजे पार्थ पवारांनी कोरेगाव पार्कात आयटी पार्क आणि डेटा सेंटर उभारण्याची तयारीही चालवली, एक लाखाचे भांडवल असलेल्या कंपनीला हे कसे काय शक्य होते, असा सवालही या निमित्ताने विरोधकांकडून उपस्थित केला. या व्यवहारासाठी उद्योग संचालनालयाने ४८ तासात स्टॅम्प ड्युटीही माफ केली, तर केवळ २७ दिवसांत हा व्यवहार झाला होता. हे प्रकरण माध्यमांमध्ये आल्यानंतर संबंधित व्यवहार रद्द करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री तथा पार्थ पवार यांचे वडिल अजित पवार यांनी माध्यमांसमोर येऊन दिली होती. दरम्यान, या प्रकरणावरुन राजकीय वातावरण चांगलंच तापल्याचं दिसून आलं.




CMYK

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महानगरपालिका निवडणूक मदत कक्षाचे उद्घाटन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३ डिसेंबर :** लातूर शहर महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रारूप मतदार यादीवरील आक्षेपांसह मतदार यादीत मतदारांचे नाव पाहण्यासाठी मनपात मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या मदत कक्षाचे उद्घाटन मनपा आयुक्त मानसी मीना त्यांच्या हस्ते करण्यात आले.

मनपा सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचनांचा कार्यक्रम




दि. ३ डिसेंबरपर्यंत सुरु आहे. सदर प्रारूप मतदार यादीतील मतदारांना आपल्या प्रभागातील मतदार यादीत नाव असल्याची खात्री करून घेण्यासाठीनुख्या कार्यालय व क्षेत्रीय कार्यालयात मदत कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. मनपा कार्यालयातील मदत कक्षाच्या उद्घाटनप्रसंगी उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, सहायक आयुक्त नंदकिशोर तापडे, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, वाहन विभाग प्रमुख पवन सुरवसे, निवडणूक विभागाचे महेश शर्मा, दीपक पवार. संदीप बुलबुले उपस्थित होते.



# वाहनधारकांना शिस्त लावण्यासाठी पोलिसांकडून दंडात्मक कार्यवाहीचा बडगा



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३ डिसेंबर :** लातूर शहरातील अवैध प्रवासी वाहतूक करणारे वाहनधारक तसेच शहरातील औसा रोडवर खाद्यपदार्थांच्या हातगाड्यांसमोर बेशिस्तपणे वाहने पार्क करणाऱ्या वाहनधारकांवर लातूर पोलिसांनी दंडात्मक कार्यवाहीचा बडगा उगारण्याचा निर्णय घेतला असल्याचे शहर उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांनी सांगितले.

बहुसंख्य वाहनधारक वाहन चालविताना वाहतुकीच्या नियमांचे पालन करताना दिसत नाहीत. ऑटोचालक आपल्या पुढच्या सीटवर बेकायदेशीरपणे प्रवाशी वाहतूक करताना आढळून येतात. ऑटोचालक त्यांना नेमून देण्यात आलेला गणवेश परिधान करताना दिसत नाहीत. शहरात बेशिस्तपणे कोठेही अचानक ऑटो थांबविणे, प्रवासी चढ-उतार करणे, चौका-चौकामध्ये वळणांवर प्रवासी घेण्यासाठी ऑटोरिक्षाची दुहेरी रांग करून ऑटो थांबविणे आदी कारणांमुळे अन्य वाहनधारकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी पोलीस प्रशासनाकडे आल्याने शहर वाहतूक शाखेने वाहनधारकांना शिस्त लावण्यासाठी दंडात्मक कार्यवाहीची मोहीम हाती घेतली आहे. मोटारसायकलवरून ट्रिपल सीट प्रवास करणे, विना कागदपत्र, इन्शुरन्स, पीयूसी, वाहनांची कागदपत्रे सोबत न बाळगणाऱ्या वाहनधारकांवरही यापुढे दंडात्मक कार्यवाही केली जाणार आहे. चालत्या वाहनावर मोबाईलवर संभाषण करणाऱ्यांनाही आता या कार्यवाहीचा सामना करावा लागणार आहे. मोटार वाहन कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांवर कठोर कार्यवाही केली जाणार आहे. गणवेश न परिधान करता ऑटो चालवणाऱ्या २०३ ऑटोचालकणांवर केसेस करण्यात आल्या असून १ लाख ४१ हजार ५५० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. मुख्य चौकात ५० ते ७५ मीटर अंतराचे आत थांबणाऱ्या ऑटो तथा वाहनावरही कार्यवाही केली जाणार असल्याचे समीरसिंह साळवे, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांनी सांगितले.

## इस्कॉनच्या मूल्य शिक्षणावर आधारित ७ डिसेंबरला कार्यक्रम

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३ डिसेंबर :** इस्कॉनच्या लातूर परिवाराच्या वतीने रविवार दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी चार वाजता महाविद्यालयीन तरुणांसाठी मूल्य शिक्षणावर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम बार्शी रोडवरील गिरवलकर मंगल कार्यालयात होणार आहे. या कार्यक्रमासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र . कुलगुरू अशोक महणज, नॅकचे संचालक सुरेंद्रनाथ रेड्डी यांची उपस्थिती राहणार आहे. देशातील ख्यातनाम प्रेरणादायी व्याख्याते अमोल लीला दास यांच्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थी व उपस्थितांना होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी विद्यार्थ्यांना नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी करण्यासाठी शैक्षणिक क्षेत्रातील किंवा महाविद्यालयीन अधिकाऱ्यांकडून प्रवेश पासेस उपलब्ध करून दिले जाणार आहेत. या कार्यक्रमासाठीची नोंदणी पूर्णतः निःशुल्क आहे. मात्र प्रवेशासाठी पासेस अनिवार्य करण्यात आलेले आहेत. या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त विद्यार्थी व तरुणांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## अभिनेत्री विशाखा सुभेदार यांच्या हस्ते नटवर्य श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३ डिसेंबर :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद जिल्हा शाखा लातूरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या नटवर्य श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडक राज्यस्तरीय नाट्य स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ गुरुवार, दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी दोन वाजता हास्यजत्रा फेम अभिनेत्री विशाखा सुभेदार यांच्या विशेष उपस्थितीत दगडोजीराव देशमुख नाट्यगृह, मार्केट यार्ड लातूर याठिकाणी संपन्न होणार आहे.



याप्रसंगी माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती राहणार आहे. या वर्षीच्या स्पर्धेत एकूण २८ संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यामध्ये हैद्राबाद, पुणे, मुंबई, ठाणे, जालना, परभणी, लातूर, सोलापूर आदी ठिकाणच्या संघांनी एकांकिका सादर केल्या. विजयी संघांना अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या लातूर जिल्हा शाखेच्या वतीने रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे ज्येष्ठ अभिनेत्री विशाखा सुभेदार अभिनित दि दमयंती दामले या कौटुंबिक विनोदी नाटकाचा प्रयोगही खास लातूरकराच्या आग्रहास्तव नाट्य रसिकांसाठी गुरुवारी रात्री ९ वाजता दगडोजीराव देशमुख सभागृह लातूर येथे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास नाट्यप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन नाट्य परिषदेचे लातूर जिल्हाध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर, कार्यवाह धनंजय बेंबडे, समन्वयक अविष्कार गोजमगुंडे, अजय गोजमगुंडे, कोषाध्यक्ष अमोल नानजकर, कल्याण वाघमारे, एड. राणीताई स्वामी, अरुण बारस्कर, बालाजी सूळ, संतोष साळुंके, अनिल कांबळे, उमाकांत हुरदुडे, राजू गड्डीमे, सुधन्वा पत्की आदिंनी केले आहे.

# थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी जप्ती मोहीम

## नागरिकांनी तातडीने कर भरून प्रशासनास सहकार्य करावे : आयुक्त श्रीमती मानसी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३ डिसेंबर :** मालमत्ता कर वसुली साठी महानगरपालिकेने अनेक वेळा कर सवलतीची योजना राबवली मात्र बर्याच मालमत्ताधारकांनी याकडे कानाडोळाच केला.त्यामुळे महानगरपालिकेने आता थेट धडक जप्ती मोहिमेला सुरवात केली आहे.त्याकरिता ८ पथक नेमण्यात आले आहेत.

लातूर शहर महानगरपालिकेमार्फत शहरातील प्रलंबित मालमत्ता कर वसुलीसाठी विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत मालमत्ता कराची थकबाकी ठेवणाऱ्या करदात्यांविरुद्ध कठोर पावले उचलून त्यांच्या मालमत्तांवर जप्ती व नळ खंडन कारवाई करण्यात येत आहे.

आज दि.३ डिसेंबर रोजी महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय सी अंतर्गत तीन नळखंडन करण्यात आले व तर ३ निवासी मालमत्तांचे जप्ती करण्यात आले तसेच क्षेत्रीय करायला ब तीन नळखंडन व ५ निवासी मालमत्तांचे जप्ती करण्यात आले आले. तसेच क्षेत्रीय कार्यालय अ अंतर्गत जप्ती मोहिमेअंतर्गत ८ निवासी मालमत्तांचे जप्ती करण्यात आले आले.

थकीत कराच्या वसुलीसाठी मनपाकडून मोहीम राबविण्यात



येत आहे. ही मोहीम अधिक तीव्र केली जाणार आहे. जप्त केलेल्या मालमत्ताधारकांनी मुदतीत कर भरणा न केल्यास लिलाव प्रक्रिया करण्यात येणार आहे. त्यामुळे जप्तीसारखी कटू कारवाई टाळण्यासाठी थकबाकीदारांनी कर भरून मनपाला सहकार्य करावे, असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त श्रीमती मानसी यांनी केले आहे.

# कृषीपंपांना कॅपॅसिटर बसवा, रोहीत्रे व वीजयंत्रणेची हानी टाळा

### महावितरणचे शेतकऱ्यांना आवाहन



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३ डिसेंबर :** रब्बीचा हंगाम सुरू झाला की कृषीपंपाचा वापर वाढत जातो. अनेकदा रोहीत्रांसोबतच पाण्याची मोटर जळाल्याच्या तक्रारी वाढत जातात. विजेचा भार नियंत्रीत करणारे कॅपॅसीटरचा वापर फार कमी शेतकरी करतात त्याचबरोबर ॲटोस्विचचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. परिणामी अचानक विजेचा भार वाढल्याने वीज यंत्रणे सोबतच पाण्याची मोटर जळण्याचे प्रमाण वाढते त्यामुळे शेतकऱ्यांनी कृषीपंपाचा वापर योग्य ते कॅपॅसीटर लावूनच करावा असे आवाहन महावितरणने केले आहे.

वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर कृषिपंप तत्काळ सुरू करण्याच्या उद्देशाने बहूतांश शेतकरी कृषिपंपाना ऑटोस्विच बसविले आहेत. त्यामुळे परिसरातील अनेक कृषिपंप एकाच वेळी सुरू होऊन रोहित्रावरील भार अचानक वाढतो. परिणामी रोहित्र जळणे, वीजवाहिन्या बंद वा नादुरुस्त होणे तसेच पाण्याची मोटर जळन्याचे प्रमाण वाढते. यातून होणारी गैरसोय व नुकसान होवू नये तसेच सुरळीत व योग्य दाबाचा वीजपुरवठा मिळावा, यासाठी शेतकऱ्यांनी कृषिपंपांना ऑटोस्विचऐवजी कॅपॅसिटर बसवावेत.

राज्यात ४५ लाखांहून अधिक कृषिपंपधारक शेतकरी आहेत. महावितरणकडून शेतकऱ्यांना दिवसा व रात्री अशा चक्राकार पद्धतीने वीजपुरवठा करण्यात येतो. रात्रीच्या वेळेत वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर शेतात जाऊन कृषिपंप चालू करण्याचा त्रास वाचवण्यासाठी राज्यात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी कृषिपंपांना ऑटोस्विच लावले असल्याचे दिसून येते. त्यामुळे वीज येताच कृषिपंप आपोआप चालू होतो. परिणामी रोहित्रांवरील भार एकाच वेळी वाढत असल्याने रोहित्र जळण्याचे किंवा नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढत आहे. ऐन हंगामात रोहित्र जळाल्यास त्याची झळ शेतकऱ्यांनाही सोसावी लागते. हे टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी कृषिपंपांना ऑटोस्विच लावू नये तसेच इतर शेतकऱ्यांनी ते लावले असल्यास त्वरीत काढून टाकावेत असे आवाहन महावितरणने केले आहे.

# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धा उत्साहात

## शीघ्र निदान आणि उपचारामुळे दिव्यांगत्वाचे प्रमाण कमी करणे शक्य : राहुलकुमार मीना








**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३ डिसेंबर :** दिव्यांगत्व टाळण्यासाठी विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे. शीघ्र निदान व उपचारामुळे दिव्यांगत्वाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे बालकांमधील दिव्यांगत्वाचे निदान करून त्यांना वेळीच उपचार उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. अंगणवाडीस्तरावर यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी सांगितले.

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग कल्याण आयुक्तालय, दिव्यांग सक्षमीकरण विभाग, जिल्हा परिषद, लातूर, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र व दिव्यांगांच्या विशेष शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर येथील रुक्मिणी मंगल कार्यालय येथे आयोजित दिव्यांग विद्यार्थ्यांच्या जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेचे उद्घाटन मीना यांच्या हस्ते झाले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, महिला व बालकल्याणचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यादवराव गायकवाड, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, माध्यमिक शिक्षण विभागाचे अधिक्षक मधुकर वाघमारे यांची उपस्थिती होती.

दिव्यांगत्वाला शारिरीक व्याधी न समजता सामाजिक दायित्व समजून दिव्यांगांचे सक्षमीकरण करणे गरजेचे आहे. तसेच दिव्यांगत्व टाळण्यासाठी विशेष प्रयत्न आवश्यक आहेत. बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून दिव्यांगांनाही विविध संकेतस्थळांवर माहिती व लाभ ही मिळत आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये १०० विशेष शिक्षकांना सामावून घेण्यात आले आहे. आता त्यांना विशेष प्रशिक्षण देण्याचा मानस आहे, असे मीना म्हणाले.

प्रास्ताविकात जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी नाईकवाडी यांनी यंदाच्या वर्षात विविध उपक्रम राबवून ३ ते ९ डिसेंबर दरम्यान दिव्यांग सप्ताह साजरा होणार असल्याचे सांगून जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या सहाय्याने ट्रायसिकल व विविध दिव्यांगांना उपयुक्त साहित्य ही वाटप केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सूत्रसंचालन बंकट पवार, व्यंकट लामजने, सिंधू इंगळे यांनी केले, तर डॉ. राजु गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून रंगकर्मी अश्लेषा वाकडे व अभिनव घोडके यांनी काम पाहिले. यशस्वीतेसाठी शिवाजी शिरडे, मोहन चव्हाण, बाळासाहेब वाकडे, डॉ. योगेश निटुरकर, बस्वराज पैके, विक्रम जाधव, राहुल काळे, शिवराज गायकवाड, वर्षा जोगदंड, विजय बुरांडे, अण्णासाहेब कदम, शिवप्रसाद भंडारे, गणेश पाटील, बालाजी बनसोडे, श्रीकांत उंबरे यांनी परिश्रम घेतले.

यंदाच्या वर्षात दिव्यांग दिनानिमित्त विशेष दिव्यांग थीम तयार करण्यात आली असून 'सामाजिक प्रगतीसाठी दिव्यांग- सर्वसमावेशक समाज घडविणे' ही विशेष बाब राहणार आहे. यात दिव्यांगासाठी स्वीकार व आदर, दया नव्हे मान-सन्मान, कौशल्य व क्षमतेला मान्यता देणे, समान संधी उपलब्ध करून देणे, शिक्षण, रोजगार व आरोग्य सेवा व सार्वजनिक वाहतुक यामध्ये भेदभाव न करता संधी देणे. यासह विविध दिव्यांगांप्रती सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस आहे.

या थीमची माहिती विशेष शिक्षक व्यंकट लामजने यांनी दिली.

**दिव्यांग विद्यार्थ्यांनी सादर केला लक्षवेधी कलाविष्कार**

या जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेत जिल्ह्यातील ५७ दिव्यांगांच्या शाळांतील ३३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या या कलाविष्काराने रसिक मंत्रमुग्ध झालेच, याशिवाय दिव्यांगांच्या उत्कृष्ट कलाकृतीने मान्यवरांनाही मोहित केले. यात समुहनृत्य गायन, मुकनाट्य, वैयक्तिक नृत्य, लावणी, देशभक्तीपर गीत यांचा समावेश होता.

## थोडक्यात...

### स्कोडा तर्फे २५ वर्षांत ५ लाख गाड्यांची विक्री



**छत्रपती संभाजीनगर :** स्कोडा ऑटो इंडियाने भारतातील २५ वर्षांच्या प्रवासात ५ लाख युनिट्स विक्रीचा टप्पा गाठला असून नोव्हेंबर २०२५ मध्ये ५,४९१ युनिट्सची ९० टक्के वार्षिक वाढ नोंदवली. वाढते नेटवर्क, मूल्य-आधारित ऑफर्स आणि मजबूत उत्पादन पोर्टफोलिओ हे या वाढीचे प्रमुख घटक असल्याचे ब्रँड संचालक आशिष गुप्ता यांनी सांगितले. ऑक्टाव्हिया आणि स्लाव्हिया यांसारख्या सेडान्ससोबत कुशाक, कायलॅक आणि कोडियाक या एसयूव्ही मॉडेल्सनी ब्रँडची पोजिशनिंग अधिक मजबूत केली असून सुरक्षा आणि तंत्रज्ञानाच्या निकषांमध्येही स्कोडाने अग्रक्रम कायम ठेवला आहे. १८० शहरांतील ३२० पेक्षा अधिक टचपॉइंट्ससह कंपनी २०२५ हे सर्वाधिक वाढीचे वर्ष करण्याच्या दिशेने वेगाने आगेकूच करत आहे.

### छत्रपती संभाजीनगर येथे दुर्मीळ आजारावर बोन मॅरो ट्रान्सप्लांट



**छत्रपती संभाजीनगर, दि. २ डिसेंबर :** मेडिकोव्हर हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर येथे अत्यंत दुर्मीळ आणि जीवघेण्या ए.एल. अमायलोइडोसिस रुग्णावर यशस्वी बोन मॅरो (स्टेम सेल) ट्रान्सप्लांट करण्यात आल्याची माहिती हॉस्पिटलने दिली. हा उच्चजोखमीचा उपचार डॉ. निकेत मंत्री यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण झाला आहे. ४८ वर्षीय महिला रुग्णाला सुरुवातीला चेहऱ्यावर व पायांवर सूज तसेच नेफ्रोटिक रेंज प्रोटीन्युरिया अशी लक्षणे दिसून आली. तपासणीत रिनल तसेच बोन मॅरो बायोप्सीद्वारे ए.एल. अमायलोइडोसिसचे निदान निश्रि्चत झाले. मेल्फ्लॅन-आधारित कंडिशनिंगनंतर ४.०५ दशलक्ष स्टेम सेल्सच्या साहाय्याने प्रत्यारोपण यशस्वीपणे पूर्ण झाले. रुग्णाने दिवस +१२ रोजी एंग्राफ्टमेंट साध्य केली आणि दिवस +१८ रोजी पूर्णपणे स्थिर अवस्थेत डिस्चार्ज मिळवला. या उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे मोठे सहकार्य लाभले. हा उपचार आमच्यासाठी स्वप्नवत ठरला, असे रुग्णाच्या कुटुंबीयांनी सांगितले.

### भारतात लाँच झाली वीवो एक्स ३०० मालिका

नवी दिल्ली : वीवो इंडिया ने आज त्यांचे नवीनतम फ्लॅगशिप स्मार्टफोन, वीवो एक्स ३०० आणि एक्स ३०० प्रो लाँच करण्याची घोषणा केली. वीवो ने ज़ाइस च्या सहकार्याने विकसित केलेल्या इमेजिंग उत्कृष्टता आणि डिझाइन नवोपक्रमाचा वारसा पुढे चालू ठेवला. एक्स ३०० मालिकेत व्यावसायिक दर्जाचा ज़ाइस ऑप्टिक्स, नवीन, बुद्धिमान ओरिजिन ओएस ६ आउट-ऑफ-द-बॉक्स, वाढीव उत्पादकता आणि एआई आणि मीडियाटेक डाइमेंसिटी ९५०० द्वारे समर्थित फ्लॅगशिप कामगिरी आहे. भारतात काळजीपूर्वक तयार केलेली आणि उत्पादित केलेली ही मालिका प्रीमियम डिझाइन, प्रगत इमेजिंग तंत्रज्ञान आणि अंतर्ज्ञानी वापरकर्ता अनुभव देण्यावर वीवो चे सतत लक्ष केंद्रित करते हे प्रतिबिंबित करते.

### ९ वर्षीय मुलीवर किडनी प्रत्यारोपण

पुणे - पुण्यातील खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी अंतिम टप्प्यातील किडनी आजाराने पीडित असलेल्या ९ वर्षीय मुलीवर जिवंत दात्याचे किडनी प्रत्यारोपण यशस्वीरित्या केले आहे. या दुर्मिळ व यशस्वी केसमध्ये या मुलीला तिच्या ६९ वर्षीय आजीकडून किडनी मिळाली, ज्यामधून दिसून येते की, मुलांमध्ये प्रत्यारोपण करताना वय आणि कौटुंबिक नात्याचा विचार केला जाऊ शकतो.९ वर्षीय सक्रिय व हुशार मुलीला सौम्य स्वरूपाचा ताप, अशक्तपणा व खोकला या तक्रारींसह हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. बालरोगतज्ज्ञांकडून पुढील उपचार व चाचणीमधून फक्त ३ स/ वश्र ची अत्यंत कमी हिमोग्लोबिन पातळी असल्याचे निदर्शनास आले. पुढील तपासण्यांमधून किडनी कार्यावर गंभीर परिणामाची पुष्टी झाली आणि इमेजिंगमधून दिसून आले की दोन्ही किडन्या अत्यंत लहान होत्या आणि आकुंचन पावल्या होत्या. यामधून गंभीर किडनीच्या आजाराचे निदान झाले, ज्याकडे मूत्रमार्गात लक्षणे दिसून न आल्याने दुर्लक्ष झाले होते

### प्रदूषणमुक्त मालवाहतुकीला मिळतेय चालना

**मुंबई :** भिवंडी, पुणे, नागपूर आणि नाशिकमध्ये नयी सोच की सवारी या जागरूकता सत्रातून एक गोष्ट अधोरेखित झाली, ती म्हणजे ट्रकचालकांकडून शून्य उत्सर्जन करणाऱ्या फ्रेट उपाययोजनेसाठी मागणी वाढत आहे आणि त्यांच्यापैकी अनेक जणांसाठी इंधनाचा कमी खर्च आणि शुद्ध हवा हे या मागणीसाठी कारणीभूत ठरणारे प्रमुख घटक आहेत.प्रदूषण न करणाऱ्या वाहतूक व्यवस्थेसाठी महाराष्ट्राकडून या वर्षी विशेष प्रोत्साहन देण्यात येत आहे. विशेषतः, महाराष्ट्राने २०३० पर्यंत ३०% ईव्ही स्वीकारार्हतेचे महत्त्वाकांक्षी लक्ष साध्य केल्यानंतर यासाठी वेगाने हालचाली सुरू झाल्या आहेत. या परिवर्तनासाठी १,९९३ कोटींची तरतूद करण्यात आली आहे आणि मुंबई-पुणे द्रूतगती महामार्ग आणि अटल सेतू यासारख्या प्रमुख मार्गांवर इलेक्ट्रिक वाहनांसाठी टोल शुल्क माफ करण्यात आले आहे.

### सुंबुल तौकीर खान मराठमोळ्या रूपात सजली

मुंबई सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी' ही मालिका आता एका अत्यंत भावनिक आणि निर्णायक टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. आपल्या साखरपुड्याच्याच दिवशी विराट (रजत वर्मा)च्या नाहीशा होण्याने हातबुद्ध झालेली अन्विता (सुंबुल तौकीर खान) एक जीवन पालटून टाकणारा निर्णय घेते. आपल्या हरवलेल्या प्रेमापेक्षा जबाबदारीला जास्त महत्त्व देऊन ती संजय (ऋषी सक्सेना) या आपल्या लहानपणीच्या मित्राशी विवाहबद्ध व्हायचे ठरवते. हा केवळ तिच्या प्रवासातीलच नाही, तर मालिकेतील मोठा टर्निंग पॉइंट आहे.

### सौ सुभद्राबाई बंडु धाडगे यांचे निधन



**बिडकीन, दि. ३ डिसेंबर :** बिडकीन येथील सौ सुभद्राबाई बंडु धाडगे रा. माळी गल्ली बिडकीन (वय ७५ वर्ष) यांचे आज दि. ३ डिसेंबर बुधवार रोजी पहाटे ५ वाजता अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज दि ३ रोजी सकाळी ११ वाजता शेकटा रोडवरील अमरधाम स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात, पती, सवत, असा परिवार आहे.

# दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांगांचा सत्कार

**छत्रपती संभाजीनगर, दि.३ डिसेंबर :** जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जिल्हा परिषद समाजकल्याण विभागामार्फत तापडीया नाट्यगृह निराला बाजार येथे दिव्यांग दिन साजरा करण्यात आला.यावेळी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केलेल्या दिव्यांगांचा तसेच दिव्यांग कल्याण क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ति व संस्थांचा सत्कार करण्यात आला.

अध्यक्षस्थानी इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध विकास, अपारंपारिक उर्जा मंत्री अतुल सावे होते. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त दीपक खरात, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी बाबासाहेब अरवत आदी मान्यवर उपस्थित होते.

दिव्यांग कल्याण विभागाचा परिचय, दिव्यांग कल्याणासाठी शासकीय योजना, विभागाचे धोरण, कायदे, नियम, दिव्यांग प्रतिबंधात्मक उपाय याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती व संस्था तसेच राज्यस्तरावर क्रीडा स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळविणारे खेळाडू यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले. त्यास जिल्ह्यातील दिव्यांगाच्या विशेष शाळा, कार्यशाळा येथील मुख्याध्यापक व कर्मचारी यांनी कार्यक्रमास सहकार्य केले.

मुख्याध्यापक कैलास निकम यांनी सूत्रसंचालन केले तसेच श्रीमती यामिनी काळे यांनी आभार प्रदर्शन केले.



## गंगापूरमध्ये ७१.७६% मतदान



**गंगापूर, दि.३ डिसेंबर :** नगरपरिषदेच्या निवडणूक २०२५ करीता मंगळवारी (दि.२) शांततेत मतदान पार पडले यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. तसेच प्रभाग क्रमांक सहा ब आणि प्रभाग क्रमांक चार ब करीता वीस तारखेला मतदान होणार आहे. निवडणूकीचा निकाल २१ तारखेला लागणार आहे.

सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० पर्यंत २१ हजार१७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला यात. पुरुष १० हजार सातशे ८८ आणि महीला ,१० हजार दोनशे २८ व ईतर १ असे एकूण २१ हजार १७ मतदान झाले आहे मतदान टक्केवारी ७१.७६ टक्के झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी नवनाथ वगवाड यांनी दिली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी नवनाथ वगवाड सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी संतोष आगळे उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. निलेश पालवे पोलिस निरीक्षक कुमारसिंह राठोड यांनी प्रयत्न केले.

## डॉ. अनुपम टाकळकर यांचा गौरव

**छत्रपती संभाजीनगर, दि. ३ डिसेंबर :** छत्रपती संभाजीनगर येथील इंडियन मेडिकल असोसिएशनतर्फे आयोजित भव्य नागरी सत्कार सोहळ्यात राज्य आयएमएचे सहसचिव म्हणून निवड आणि आठ महिन्यांत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल अध्यक्ष डॉ अनुपम टाकळकर यांचा गौरव करण्यात आला. वैद्यकीय, प्रशासकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला उंची प्राप्त झाली.

कार्यक्रमात माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री आणि खासदार डॉ भागवत कराड यांनी डॉ टाकळकर यांना परिणामकारक नेतृत्वाचे उत्तम उदाहरण ठरविले. त्यांच्या नेतृत्वामुळे छत्रपती



संभाजीनगर शाखेने राज्यात आणि राष्ट्रीय स्तरावर आदर्श स्थान मिळविल्याचे त्यांनी सांगितले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता तसेच विविध अधिकाऱ्यांनी डॉ टाकळकर यांच्या उपक्रमांची प्रशंसा करून आरोग्य सेवा गावोगावी पोहोचवण्याच्या त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे कौतुक केले.

डॉ टाकळकर यांनी दत्तक गाव उपक्रम, आरोग्य शिबिरे, महिला सफाई कामगार व 'घंटा गाडी' कर्मचाऱ्यांसाठी तपासणी मोहीम अशा विविध उपक्रमांतून खच- ला लोकाभिमुख बनविले. माजी अध्यक्ष डॉ गाडे आणि डॉ रांजळकर यांनी त्यांच्या समन्वयक नेतृत्वाची प्रशंसा केली.

कार्यक्रमाचे संयोजन डॉ शहाजी तौर यांच्या नेतृत्वाखालील टीमने केले. उपस्थितांमध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ विनय राठोड, सिव्हिल सर्जन डॉ कमलाकर मुंडे, विविध वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांचा समावेश होता.

डॉ. टाकळकर यांनी हा सन्मान संपूर्ण टीमचा असल्याचे नमूद करून पुढील उपक्रमांची रूपरेषा मांडली.

# एमजीएममध्ये सायबर सुरक्षेसंदर्भात जनजागृतीपर व्याख्यान



**छत्रपती संभाजीनगर, दि.३ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डॉ.जी.वाय. पाथ्रीकर संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, एमजीएम क्लोव्हर डेल स्कूल आणि एमजीएम संस्कार विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सायबर दिनानिमित्त एनसीसी कॅडेट्ससाठी सायबर हायजीन आणि सुरक्षित डिजिटल व्यवहार या विषयावरील पोलीस निरीक्षक धिरेंद्रसिंग बिलवाल यांच्या जनजागृतीपर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.प्राप्ती देशमुख, एएनओ लेफ्टनंट डॉ.वैशाली चव्हाण, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक धिरेंद्रसिंग बिलवाल म्हणाले, अपरिचित लिंकवर क्लिक करणे, ओटीपी शेअर करणे यांसारख्या छोट्या चुका मोठ्या सायबर फसवणुकीत परिवर्तित होत असतात. खाते हॅक झाल्यास, चुकीची ट्रान्झॅक्शन झाल्यास किंवा संशयास्पद संदेश आल्यास काय करावे, याविषयी आपण माहीतगार असणे आवश्यक आहे. अशावेळी घाबरू नये, पुरावे डिलिट करू नयेत आणि तत्काळ तक्रार नोंदवणे आवश्यक असते.

माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार फेक प्रोफाइल, छेडछाड, फेक माहिती आणि सायबर बुलिंग हे गंभीर गुन्हे असल्याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. सतर्क रहा, ओटीपी शेअर करू नका आणि लिंक क्लिक करण्यापूर्वी विचार करा, असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक धिरेंद्रसिंग बिलवाल यांनी यावेळी केले.

## आ. सत्तार यांच्या हस्ते कापूस खरेदी केंद्राचा शुभारंभ

**सोयगाव,दि.३ डिसेंबर :** तालुक्यातील कंकराळा येथील प्रगती जिनिंग प्रेसिंग येथे सीसीसाय यांच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या शासकीय कापूस खरेदी केंद्राचा शुभारंभ आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाला.

याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा.गाढे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर काळे, केशवराव तायडे, सिल्लोड-सोयगाव बाजार समितीचे सभापती विश्वास पा.दाभाडे, उपसभापती संदीप राऊत, धरमसिंग चव्हाण, गोपी जाधव, सीसीआय केंद्राचे संचालक के.पी. मीना, शुभदीप खान आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कंकराळा येथील या केंद्रामुळे शेतकऱ्यांचा कापूस शासनाच्या आधारभूत किमतीनुसार खरेदी होणार असून यामुळे खाजगी व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणूक थांबणार असल्याचे प्रतिपादन आ. अब्दुल सत्तार यांनी याप्रसंगी व्यक्त



केले. सोयगाव येथे जिनिंग प्रेसिंग तसेच सीसीसाय केंद्र सुरू व्हावे ही येथील शेतकऱ्यांची अनेक दिवसांपासून मागणी होती.देश स्वातंत्र्य झाल्यापासून पहिल्यांदा येथे जिनिंगची स्थापना व सीसीसाय ची खरेदी होत आहे. या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन आ. सत्तार यांनी कापूस उत्पादक शेतकऱ्यांना केले. तसेच प्रगती सह.जिनिंग प्रेसिंग ही शेतकऱ्यांच्या मालकीची जिनिंग प्रेसिंग असून ही जिनिंग अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सुसज्ज व्यवस्थेसह परिपूर्ण आहे. शेतकऱ्यांनी पूर्व नोंद करून या कापूस खरेदी केंद्रावर पाठवावे असे ते म्हणाले.

याप्रसंगी आ. सत्तार यांच्या हस्ते शेतकरी सतीश गजानन बिंदवाल रा.तिडका, गजानन लक्ष्मण ढगे रा. आमखेडा तसेच ट्रॅक्टर चालक कृष्णा संजय ढाकरे यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास दारासिंग चव्हाण, कुणाल राजपूत, राधेश्याम जाधव, शेख सलीम, भारत तायडे, अक्षय काळे, राजू दुतोंडे, कदिर शहा, हर्षल काळे, संदीप सुरडकर, भगवान जोहरे, गजानन कुडके, अतिश ताठे, दिलीप देसाई, मेघराज राठोड, आत्माराम पवार, बद्री चव्हाण, इब्राहिम देशमुख, नाजीम पठाण, नारायण राठोड, सांडू राठोड, अविनाश पाटील, मुबारक शेख, फिरोज पठाण, डॉ.देशमुख, रवींद्र परदेसी, शरद पाटील, समाधान तायडे, शिवप्पा चोपडे, मोहन सुरडकर, देविदास राजपूत, छोटेसिंग राजपूत, भारत राठोड, विश्वास चव्हाण, शेख जाकीर, शेख मुख्तार, उस्मान पठाण, मेहबूब खान, अयुब खान, नवाब खान, भीमराव बोराडे, अजीम सय्यद, प्रवीण कदम, गजानन ढगे, सिराज पठाण, खंडू पाटील, राजमल पवार आदींची उपस्थिती होती.

## मराठवाडा एंडोव्हॅस्क्युलर समिट ३.० चे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर, दि. ३ डिसेंबर :** मराठवाडा एंडोव्हॅस्क्युलर समिट ३.० चे आयोजन ६ डिसेंबर रोजी द्योतोन हॉल, एमजीएम मेडिकल कॉलेज येथे होणार असून एंडोव्हॅस्क्युलर उपचार, रक्तवाहिनीविज्ञान, ऑन्कोलॉजी आणि अल्ट्रासाऊंड तंत्रातील नव्या प्रवाहांवर मंथन होणार आहे. ही एकदिवसीय परिषद इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजी विभाग, एमजीएम मेडिकल कॉलेज आणि इंडियन मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे.

परिषदेत देशभरातून ७०० हून अधिक प्रतिनिधी सहभागी होणार असून राष्ट्रीय पातळीवरील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. डॉ. हेमंत देशमुख एंडोव्हॅस्क्युलर व्हॅस्क्युलर ट्रीटमेंटवर, डॉ. जगदीश सिंग कॅन्सरवरील एंडोव्हॅस्क्युलर हस्तक्षेपांवर आणि डॉ. गौरव शर्मा एमएसके डिसीज व क्रीडा दुखापतीवरील नव्या उपचार पद्धतींवर भाष्य करतील. सकाळच्या सत्रात डॉ. सौरभ जोशी, डॉ. राहुल चौधरी आणि डॉ. शिवाजी पोले हे रक्तवाहिन्या आणि फुफ्फुसातील रक्तगाठींवर मार्गदर्शन करतील.

दुपारच्या सत्रात डॉ. पी.एम. जाधव, अंकुशराव कदम, डॉ. शिवाजी सुक्रे, डॉ. राजेंद्र बोहरा आदी मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन होणार आहे. तसेच किडनीवरील एंडोव्हॅस्क्युलर उपचार, वेदनानिवारण या विषयांवर विशेष सत्रे घेतली जातील. परिषदेच्या शेवटच्या टप्प्यात ४१ पेपर आणि ई-पोस्टर सादरीकरण, कार्यशाळा तसेच पारितोषिक वितरण आणि सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

## वाहतूक कोंडीची समस्या गांभीर्याने घ्यावी, पालकमंत्र्यांकडे मागणी

**अहिल्यानगर, दि. २ डिसेंबर :** शहरातील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली असून ही बाब गांभीर्याने घेऊन सर्व संबंधितांना तात्काळ उपाय योजना करण्याचे आदेश द्यावेत अशी मागणी रहदारी समस्येचे अभ्यासक अभय ललवाणी यांनी पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

शहरातील वाहतूक कोंडीच्या समस्येबाबत दि २४ जानेवारी २०२५ रोजी पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन देण्यात आले होते. या निवेदनाच्या प्रती सर्व संबंधित शासकीय यंत्रणांना देण्यात आले होते. मात्र सर्व संबंधित शासकिय यंत्रणांनी त्यावर केवळ कागदोपत्री सोपास्कार पार पाडले. प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही आजवर केलेली नाही म्हणून पुन्हा एकदा पालकमंत्र्यांसह सर्व संबंधित शासकीय यंत्रणांना अभय ललवाणी यांनी स्मरणपत्र दिले आहे. शहरातील सर्व प्रमुख रस्ते व चौकांमधील अतिक्रमणे कायमस्वरूपी हटवणे, बंद पडलेले सिग्नल सुरू करणे, सर्व प्रमुख चौकांमध्ये झेब्रा क्रॉसिंगचे पट्टे रंगविणे आदी उपाययोजना प्राधान्याने सोडवाव्यात. मात्र प्रशासन ही बाब गांभीर्याने घेत नसल्याने दिवसेंदिवस शहरातील वाहतूक कोंडीची समस्या गंभीर होत आहे. त्यामुळे आता पालकमंत्र्यांनीच ही समस्या गांभीर्याने घ्यावी, अशी मागणी ललवाणी यांनी स्मरणपत्राद्वारे केली आहे.


जा.क्र.जे-१/नोटीस/ ६१३०/२०२५,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, छ. संभाजीनगर विभाग, छ. संभाजीनगर.
दिनांक:- १९ नोव्हेंबर २०२५

**चौकशीची जाहीर नोटीस**

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.

अर्ज क्रमांक : ०५/२०२० कलम-५० (अ) (१)
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक: श्री क्षेत्र चक्रधर मंदिर सायगव्हाण, ता. कन्नड जि. औरंगाबाद नोंदणी क्रमांक ए-३६७३ (ओ.)
अर्जदार :- सुदामराज अक्काबाई खामणेकर व इतर ०२
गैरअर्जदार :- अक्काबाई खामणेकर महानुभाव रा. सायगव्हाण, ता. कन्नड जि. औरंगाबाद

सर्व संबंधीत लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार यांनी वरील न्यासाची योजना करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ५० (अ) (१) अन्वये कार्यालयात अर्ज सादर कलेला आहे. मा. धर्मादाय उप आयुक्त छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर हे वर नमूद केलेल्या अर्जासंबधी चौकशी करणार आहेत.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस (३०) दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.धर्मादाय उप आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे शिक्क्यानिशी आज दि.१९/११/२०२५ रोजी दिली.

अधीक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

**जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस**

**श्री. एम. ए. शेख, दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर) न्यायालय गंगापुर. ता. गंगापुर जि. औरंगाबाद.**
सिव्हील एम ए. क. ८०५/२०२५
प्रकरणात पुढील तरीख दि. १६/०१/२०२६
अर्जदार:- कारभारी रघुनाथ शिंदे, वय ७७ वर्ष, धंदा शेती, रा. शहापुर, पो. घोडेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद
विरूध्द
गैरअर्जदार :- निरंक
प्रकरण :- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट तखखख १८२७ अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड.आफताब एस. शेख गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हा वर नमुद ठिकाणचा कायमस्वरूपी राहणारा असुन अर्जदाराचा मुलगा नामे कमलाकर कारभारी शिंदे हा दि. १०/०७/२०२५ रोजी शहापुर पो. घोडेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे अविवाहीत मयत झालेला असुन अर्जदाराची पत्नी नामे परिगाबाई भ्र. कारभारी रिदि हि दि. २५/०१/१९९७ रोजी मयत झालेली आहे. मयतांना अर्जदार हा पति व पिता या नात्याने कायदेशीर वारसदार असुन अर्जदाराच्या व्यतिरिक्त मयतांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. मयतास वर्ग एकचे वारस नसल्याने अर्जदार हा वर्ग दोन वारसदार आहे. मयत कमलाकर कारभारी शिंदे यांना अर्जदार हा एकमेव कायदेशीर वारसदार आहे. अर्जदाराच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाही. मयत कमलाकर कारभारी शिंदे यांच्या मृत्यु मुळे अर्जदारास शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन. आज दि.०३/१२/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

**लिपीक : आदेशावरून**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर**

**जाहीर प्रगटन**

मा. दिवाणी न्यायधिश क. स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर
दि.कि. अर्ज क्र. ७९४/२०२५
अर्जदार : भाऊसाहेब एकनाथ लोगे,
वय ६२ वर्षे, धंदा शेती, रा. औरंगपूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर
विरुध्द गैरअर्जदार:- निरंक
प्रकरण :- वारस प्रमाणपत्र (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणेबाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदारानी विधिज्ञ एम. बी. गुडदे यांचेमार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार यांचे वडील एकनाथ शंकर तोगे हे दिनांक २०/०१/२००९ रोजी तर अर्जदाराची आई नामे मालनबाई भ्र. शंकर तोगे हया दि. ०२/०८/२०२४ रोजी मौजे औरंगपूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत एकनाथ शंकर तोगे व मयत मालनबाई एकनाथ तोगे यांची एक मुलगी नामे चंद्रकला साहेबराव ताकपीर (लग्नानंतरचे नाव) ही दि. २८/०४/२०२५ रोजी तर दुसरी मुलगी ताराबाई दयाराम पोकळे (लग्नानंतरचे नाव) ही दि. २०/११/२००९ रोजी मयत झालेल्या आहे, तर अर्जदार हा एकमेव मुलगा
आहे. त्यामुळे अर्जदार हे मयत एकनाथ शंकर लोगे व मयत मालनबाई एकनाथ तोगे यांचे एकमेव कायदेशीर वारस आहे. मयत एकनाथ शंकर तोगे व मयत मालनबाई एकनाथ तोगे यांना अर्जदाराशिवाय ईतर कोणीही कायदेशीर वारस नाही. मयत एकनाथ शंकर तोगे व मयत मालनबाई एकनाथ तोगे यांच्या पश्चात शासकीय-निमशासकीय बाबींचा लाभ अर्जदाराचा मिळावा म्हणून तसेच भविष्यात काही अडचण येवू नये म्हणून अर्जदारास मयत एकनाथ शंकर तोगे व मयत मालनबाई एकनाथ तोगे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र हवे आहे. करीता अर्जदाराने मयत एकनाथ शंकर तोगे व मयत मालनबाई एकनाथ तोगे यांचे वारस असल्याबाबतचे कायदेशीर वारस प्रमाणपत्राची मागणी या न्यायालयास केली आहे. त्याअर्थी वरील अर्जदाराच्या नावे मयत एकनाथ शंकर तोगे व मयत मालनबाई एकनाथ तोगे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यास कोणाचीही हरकत/ आक्षेप असेल तर त्यांनी सदर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत स्वतः किंवा त्यांच्या विधिज्ञामार्फत हजर होवून आपले आक्षेप/हरकत मांडावे नसता कुणाचीही हरकत / आक्षेप नाही असे समजून वरील अर्जदार हे मयत एकनाथ शंकर तोगे व मयत मालनबाई एकनाथ तोगे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारसाप्रमाणपत्र देण्यात येईल. करीता आज दिनांक ०३/१२/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी देण्यात येत आहे.

**कनिष्ठ लिपिक.**
**स्वाक्षरीत**
**सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय गंगापूर**

**जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस**

मा. श्रीमती. एस. एस. अग्रवाल, सह. दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर
प्रकरणात पुढील तारीख २९/०१/२०२६
सिव्हील एम.ए. क्रं. ८०४/२०२५
अर्जदार:- जुबेदा पिता अमर बागानुन, वय - ५६ वर्षे, धंदा - निरंक रा. जुने पोस्ट ऑफीस जवळ, फकीर गल्ली, गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद
विरूध्द गैरअर्जदार - निरंक
प्रकरण :भारतीय वारस कायदा १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे सक्सेशन सर्टिफिकेट मिळणेबाबत आणि बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट तखखख १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदार हिने या न्यायालात ॲड. आफताब एस. शेख रा. गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत भारतीय वारस कायदा १९२५ चे कलम ३७२ अन्वये सक्सेशन सर्टिफिकेट आणि बॉम्बे रेगुलेशन क्ट तखखख १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला की,अर्जदार वरील नमुद ठिकाणची कायमस्वरूपी राहणार असून अर्जदाराचे वडील नामे अमर हमद बागानून हे दिनांक २८/१०/१९९८ रोजी गंगापूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदाराची आई नामे मनाबी अमर बागानून दिनांक ०६/०७/२०२० रोजी वृध्दपकाळाने राहत्या घरी मौजे फकीर गल्ली, गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेली आहे. तसेच अर्जदार हिला डोळ्याने दिसन नसल्यामुळे म्हणजेच अर्जदारही अंध असल्याने अर्जदाराचे लग्न झालेले नसून ती अविवाहीत आहे. अर्जदाराचे वडील मयत अमर हमद बागानून है। जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर अंतर्गत पंचायत समिती कार्यालय, गंगापूर येथे शिपाई या पदावर कार्यारत होते. त्यांच्या मृत्युनंतर कनिष्ठ प्रशासन अधिकारी निवृत्ती वेतन कक्ष (साप्रवि) जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत कुटूंबनिवृत्ती वेतन मयत अमर हमद बागानून यांची पत्नी म्हणजेच अर्जदाराची मयत आई नामे मनाबी अमर बागानून यांना त्यांचे भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा गंगापूर ता. गंगापूर येथील खाते क्र.५२१५११६७३७० मध्ये मिळत होती. सदर खात्यात आजरोजी रक्कम रूपये ७१,१६४ /-(अक्षरी एकाहत्तर हजार एकशे चौसष्ठ रूपये मात्र) जमा असून सदर रक्कम अर्जदाराने संबंधीत बँक अधिकारी यांना व्याजासह मिळणेबाबत मागणी केली असता त्यांनी मयत मनाबी अमर बागानुन यांचे सक्सेशन सर्टिफिकेट व वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र व सक्सेशन सर्टिफिकेट देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन. आज दिनांक ०१/१२/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

**लिपिक आदेशावरून**
**सहाय्यक अधिक्षक,दिवाणी न्यायालय व स्तर गंगापूर**

## अग्रलेख...

# डिजिटल दहशतवादाचा बीमोड करण्यासाठी...

डिजिटल अरेस्टच्या वाढत्या घटनांचे आव्हान गंभीर स्वरूप धारण करीत असताना अशा प्रकरणांचा तपास सीबीआयने करावा, असा निर्देश सर्वोच्च न्यायालयाने देणे हा अशा घटनांमध्ये लुबाडल्या गेलेल्या किंवा भविष्यात या गुन्हेगारांचे लक्ष्य ठरणाऱ्या नागरिकांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे. जागतिक पटलावर भारत एक डिजिटल महासत्ता म्हणून स्वत:ला सिद्ध करीत असताना डिजिटल अरेस्टच्या घटना वाढत चाललेल्या आहेत. प्रत्यक्षात कुठलीही हिंसा घडत नसली तरी फोनच्या स्क्रीनद्वारे आपल्याला कुणी तरी आपल्या घरातच स्थानबद्ध करू शकतो, हा फार मोठा मानसिक धक्का असतो. लाखो नागरिकांनी या धक्क्याचा अनुभव घेतला आणि त्यांचे कोट्यवधी रुपये या डिजिटल दहशतवाद्यांनी लुटले. डिजिटल अरेस्ट ही नेहमीची फसवणूक किंवा सायबर गुन्हेगारी नसते. नागरिकांच्या विश्वासावर, सरकारी यंत्रणांच्या क्षमतेवर आणि देशाच्या डिजिटल प्रगतीवर प्रश्नचिन्ह उभे करणारा हा दहशतवाद आहे. याची योग्य दखल सर्वोच्च न्यायालयाने घेतली हे उत्तम झाले. पोलिसांच्या पातळीवर हे गुन्हे रोखले जाणे अशक्य असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे सीबीआयसारख्या अधिक तगड्या यंत्रणेला ही जबाबदारी दिली गेली असावी. सीबीआयकडे या कामासाठी अपेक्षित असलेली मनुष्यबळाची उपलब्धता आहे काय, हा प्रश्न आहेच. पण, तो सोडविला जाऊ शकतो. मुद्दा आहे तो डिजिटल दहशतवादाचा पूर्ण बीमोड करण्याचा. ते काम सीबीआय करू शकेल, असा विश्वास न्यायालयाएवढाच जनतेलाही वाटतो आहे. तो विश्वास सार्थ ठरविण्याची जबाबदारी सीबीआयची आहे. डिजिटल अरेस्टच्या घटनांचे आव्हान तसेही स्थानिक पोलिस दलांच्या अखत्यारीतील राहिलेले नाही. आंतरराष्ट्रीय पातळीवरील गुन्हेगारीचे धागेदोरे, कोट्यवधी रुपयांची आर्थिक उलाढाल आणि देशभरातील नागरिकांच्या मनात निर्माण झालेले भय असे अनेक आयाम या घटनांमागे आहेत. गेल्या काही वर्षांत भारतात सायबर फसवणुकीच्या केसेस देशात वाढल्या आहेतच. डिजिटल अरेस्टच्या घटनांनी सायबर गुन्हेगारीच्या आलेखात अचानक आणि प्रचंड वाढ केली. काही महिन्यांपूर्वीपर्यंत देशात या स्वरूपाच्या काहीशे तक्रारी रोज येत होत्या. आता त्यांची संख्या हजारोंच्या घरात पोहोचली आहे. डिजिटल अरेस्टच्या माध्यमातून प्रत्येक दिवशी कोट्यवधी रुपये हडपले जातात, असे अनेक राज्यांच्या सायबर सेलने स्पष्ट केले आहे. या गुन्ह्यांच्या माध्यमातून देशाच्या अर्थव्यवस्थेतील पैसा मोठ्या प्रमाणावर परदेशात जात असल्याचा मुद्दाही लक्षात आलेला आहे. त्यामुळे नागरिकच नव्हे तर देशाच्या अर्थकारणाच्या दृष्टीने सुद्धा हा दहशतवाद घातक आहे. दिल्ली, मुंबई, बंगळुरू, पुणे यांसारख्या महानगरांमध्ये या गुन्ह्यांनी कहर केला आहे. एकाच मॉड्यूलने एकाच दिवशी दीडशेहून अधिक नागरिकांना डिजिटली स्थानबद्ध केले आणि कुठली तरी अस्तित्वहीन भीती त्यांच्या गळी उतरवून त्यांना लुटले. या अशा गुन्हेगारी मॉड्यूल्सना हाताळणे कोणत्याही एका राज्य पोलिस दलाला शक्य नाही, हेच त्यातून सिद्ध होते. ही गुन्हेगारी आता राज्यांच्या सीमा ओलांडून राष्ट्रीय स्तरावर व संघटित स्वरूपात अस्तित्वात आली आहे आणि तिला आंतरराष्ट्रीय कार्टेल्सचे पाठबळही आहे. त्यामुळे तिला तोंड देण्यासाठी केंद्र सरकारच्या यंत्रणांची ताकद आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य अशा दोन्ही गोष्टी हव्या आहेत.

सहसा चर्चेत न येणारा एक मुद्दा या घटनांच्या संदर्भात अतिशय महत्त्वाचा आहे. तो असा की, या घटनांमध्ये ज्यांना लक्ष्य केले जाते, ते नोकरपेशा युवक, उच्चशिक्षित अधिकारी-कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी अशा सर्वांना सरकारी यंत्रणांबद्दल भीती वाटते. त्याची कारणे अशी की, आपल्या सरकारी यंत्रणांचा इतिहास फार चांगला नाही आणि शिवाय त्यांच्या कामकाजाची माहिती नागरिकांना नाही. फोनवर समन्स किंवा नोटीस देणे किंवा ऑनलाईन दंड भरायला लावणे असे प्रकार सरकारी कामकाजात जवळजवळ नसतातच एवढी साधी माहिती शिकलेल्या नागरिकांनाही नसते. महिलांना हे गुन्हेगार भावनिक आणि सामाजिक मुद्दे वापरून ब्लॅकमेल करतात. असे सर्व लोक कायद्याची पुरेशी माहिती नसल्यामुळे आणि अटक झाली तर आपले कसे होईल, या चिंतेमुळे अशा घटनांत बळी पडतात. लुबाडले जातात. यातील सर्वांत मोठा चिंतेचा विषय म्हणजे भीती, लाज किंवा गोंधळामुळे अनेक पीडित लोक तक्रारच करीत नाहीत. या गुन्ह्यांमध्ये वापरली जाणारी साधने अत्यंत प्रगत पद्धतीने फसवणूक करणारी असतात. पोलिस, सीबीआय यासारख्या सरकारी यंत्रणांसारखे दिसणारे कॉलर आयडीज वापरणे, डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर करून लक्ष्य केलेल्या व्यक्तीच्या आप्ताचा आवाज किंवा व्हिडीओ वापरणे, ग्रीन स्क्रीन तंत्रज्ञान वापरून खोटी कोर्टरुम दाखविणे, बनावट दस्तावेज दाखविणे, फोन कट न करण्याची सक्ती करून लक्ष्य केलेल्या व्यक्तीला एनी डेस्क किंवा टीम व्ह्युअर्ससारखे स्क्रीन शेअरिंग टुल्स वापरण्यास भाग पाडणे, त्यांचे नेटबँकिंगचे तपशील स्क्रीनच्या माध्यमातून घेणे असे अनेक प्रकार या गुन्ह्यांमध्ये घडत असतात. अशा स्थितीत लक्ष्य केलेली व्यक्ती विचारशक्ती हरवून बसते. सुरुवातीला अशा व्यक्तींना फोन करून 'आधार कार्डचा गैरवापर' किंवा 'ड्रग्स पार्सल' यांसारख्या गंभीर गुन्ह्याची नोंद तुमच्या नावावर केली किंवा केली जात असल्याची माहिती दिली जाते. अटकेचा वॉरंट तयार असल्याचे सांगून भावनिक दडपण आणले जाते. व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून स्थानबद्ध केले जाते, इतर कुणाशी बोलू दिले जात नाही, केस बंद करण्यासाठी किंवा जामीन मिळवण्यासाठी त्वरित मोठी रक्कम ट्रान्सफर करण्याचा आदेश दिला जातो आणि मग जे व्हायचे तेच घडते. पैसे ट्रान्सफर होताच ते विशिष्ट व्यवस्थेमार्फत गुन्हेगारी सिंडिकेटच्या ताब्यात किंवा देशाबाहेर जातात. अशा घटनांचे धागेदोरे तपासले असता असेही आढळले की, हे सिंडिकेट्स भारतातील तरुणांना चांगल्या कॉल सेंटर जॉबचे आमिष दाखवून कंबोडिया, लाओस, म्यानमार किंवा दुबईसारख्या देशांमध्ये नेतात. तिथे नेल्यावर त्यांचे पासपोर्ट जप्त केले जातात आणि त्यांना सायबर स्लेव्हज् (सायबर गुन्हेगारीसाठी वापरावयाचे गुलाम) म्हणून भारतीयांनाच फसवण्यासाठी वापरले जाते. या सिंडिकेट्सकडे तंत्रज्ञानाचे पाठबळ देणारी यंत्रणा असते. मनी लॉण्ड्रिंगचे नेटवर्कही असते. हवाला नेटवर्कशीही संबंध असतात. सध्याच्या भारतीय तपास यंत्रणांची रचना आणि त्यातही पोलिसांची क्षमता डिजिटल अरेस्टच्या निमित्ताने उभ्या ठाकलेल्या आव्हानाची हाताळणी करण्यासाठी अपुरी ठरत आहे. परंतु, सीबीआयचा पुढाकार आणि पोलिसांची सक्रियता यातून हे गुन्हे रोखले जाऊ शकतात. याशिवाय, आपल्याला अमेरिका किंवा ब्रिटनच्या धर्तीवर स्वतंत्र राष्ट्रीय सायबर गुन्हेगारी तपास यंत्रणा विकसित करावी लागेल. त्यासाठी हजारोंच्या संख्येने सायबर गुन्हेगारीचे तज्ज्ञ असलेले मनुष्यबळ तयार करावे लागेल. आंतरराष्ट्रीय समन्वयासाठीही काम करावे लागेल. तेवढेच महत्त्वाचे आहे ते नागरिकांच्या मनातील भीती व अज्ञान दूर करण्याचे काम. पोलिस किंवा सीबीआयसारख्या जेवढ्या यंत्रणा आहेत, त्यांनी व्यापक प्रमाणात प्रचार-प्रसिद्धी करून आपल्या कार्यपद्धतीची माहिती दिली पाहिजे. फोनवर अशाप्रकारची कोणतीही कारवाई होत नसते, असे निःसंदिग्धपणे नागरिकांना सांगितले पाहिजे. शेवटचा मुद्दा आहे तो नागरिकांनी सुजाण होण्याचा. प्रत्येकाने ही बाब लक्षात ठेवली पाहिजे की, कोणतीही सरकारी संस्था, पोलिस किंवा कोर्ट कधीही कोणत्याही कारणास्तव फोनवर पैशांची मागणी करीत नसते. तशी मागणी झाल्यास तो फसवणुकीचाच प्रकार आहे, असे बिनदिक्कत समजले पाहिजे आणि त्याची तक्रार दाखल केली पाहिजे. व्हिडीओ कॉलवर 'अटक' करणारा किंवा करू पाहणारा कोणताही 'अधिकारी' हा बनावटच असणार, हे ठामपणे लक्षात ठेवले पाहिजे. नागरिक सजग आणि हुशार झाले तर अर्ध्याअधिक केसेस जागेवरच संपतील. भारताला डिजिटल महासत्ता बनवायचे असेल तर नागरिकांनी डिजिटल जगात स्वतःचे संरक्षण करायला शिकणे आणि सरकारांनी डिजिटल सुरक्षा यंत्रणांना आधुनिक बनवणे अत्यावश्यक आहे. अशा गुन्ह्यांचा तपास सीबीआयकडे सोपविण्याचा निर्देश देऊन सर्वोच्च न्यायालयाने एक नवी दिशा दाखविली आहे. डिजिटल दहशतवाद संपविण्यासाठी पुढचे काम सरकारला आणि नागरिकांना करावे लागणार आहे.

## विशेष

# पर्यटन उद्योगात पायाभूत सुविधा

**प्रा. सुखदेव बखळे**

केंद्र सरकार गेल्या काही वर्षांपासून अर्थसंकल्पात पर्यटनाच्या पायाभूत सुविधांच्या विकासाच्या घोषणा करीत आहे. त्यातून रोजगार वाढविण्यावर भर दिला जात आहे. २००९ मध्ये पर्यटन मंत्रालयाने ?'कौशल्य ते रोजगार?' नावाची योजना सुरू केली; दुर्दैवाने त्याची फारशी चर्चा होत नाही. हा उपक्रम प्रामुख्याने शाळा सोडलेल्यांना लक्ष्य करीत होता. त्यांना रोजगार किंवा स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण देण्याची ही योजना होती. ?'हुनर से रोजगार तक?' (एचएसआरटी) योजनेचे उद्दिष्ट बाजारपेठेशी संबंधित प्रशिक्षण देऊन शहरी गरिबांमध्ये स्वयंरोजगार आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणे हे होते. या माध्यमातून कुशल कामगारांच्या मागणी आणि पुरवठ्यातील दरी भरून काढण्याचा उद्देश आहे. असंघटित क्षेत्राला कौशल्य प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. या योजनेद्वारे तरुणांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न असूनही रोजगाराच्या नेमक्या संख्येत लक्षणीय तफावत कायम आहे. भारतातील पर्यटन क्षेत्राला बळकटी दिल्याने या योजनेची प्रभाविता वाढू शकते. त्यामुळे अधिक सहभागी आकर्षित होऊ शकतात आणि या महत्त्वाच्या उद्योगात रोजगाराच्या संधी वाढू शकतात. पर्यटन क्षेत्र हे देशातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या आर्थिक क्षेत्रांपैकी एक आहे. मार्क ट्वेन भारताबद्दल म्हणाले होते की, ही अशी भूमी आहे, जी सर्व पुरुषांना पाहण्याची इच्छा असते आणि ज्याने त्याची झलक पाहिली आहे तो जगातील इतर सर्व ठिकाणे पाहूनही ती विसरू शकत नाही. जागतिक आर्थिक मंचाच्या (डब्ल्यूईएफ) प्रवास आणि पर्यटन विकास निर्देशांक, २०२४ मध्ये भारताचे स्थान ३९ आहे. पर्यटन क्षेत्र भारताच्या जीडीपीमध्ये सात टक्के योगदान देते.

एप्रिल २००० ते डिसेंबर २०२३ या कालावधीत हॉटेल आणि पर्यटन उद्योगात एकत्रित ?'एफडीआय इक्विटी?'चा प्रवाह १७.१ अब्ज अमेरिकन डॉलर्स होता. तो विविध क्षेत्रांमध्ये मिळालेल्या एकूण एफडीआयच्या २.५७ टक्के होता. ?'इंडिया ब्रँड इक्विटी फाऊंडेशन?' (आयबीईएफ) च्या पर्यटन आणि आतिथ्य उद्योगाच्या वाढीच्या अहवालानुसार, प्रवास आणि पर्यटन हे भारतातील दोन सर्वात मोठे उद्योग आहेत, जे देशाच्या जीडीपीमध्ये अंदाजे १७८ अब्ज अमेरिकन डॉलर्सचे योगदान देतात. प्रवास आणि पर्यटनामुळे ३२.१ दशलक्ष रोजगार निर्माण झाले, जे २०२१ मध्ये एकूण रोजगाराच्या ७.५ टक्के होते. आतिथ्य उद्योग (हॉटेल, रेस्टॉरंट्स आणि ट्रॅव्हल एजन्सीसह) लाखो लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार प्रदान करतो. देशांतर्गत पर्यटन ही या उद्योगासाठी एक प्रेरक शक्ती आहे. २०१९ मध्ये १.८ अब्जपेक्षा जास्त देशांतर्गत पर्यटकांनी प्रवास केला आणि अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान दिले. पर्यटन मंत्रालयाच्या मते डिसेंबर २०२३ मध्ये परदेशी पर्यटकांच्या आगमनाची (एफटीए) संख्या १,०७०,१६३ इतकी नोंदविली गेली. जानेवारी-डिसेंबर



२०२३ या कालावधीमध्ये परदेशी पर्यटकांची संख्या ९,२३६,१०८ इतकी नोंदविली गेली. ती जानेवारी-डिसेंबर २०२२ मध्ये ६,४३७,४६७ होती. परदेशी पर्यटकांच्या दृष्टीने लोकप्रिय स्थळांमध्ये आग्रा येथील ताजमहाल, अमृतसर येथील सुवर्णमंदिर, गोव्याचे समुद्रकिनारे, केरळचे बॅकवॉटर आणि हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडची टेकडी यांचा समावेश आहे. आता त्यात उत्तर प्रदेशातील अयोध्येतील राम मंदिराची भर पडली आहे.

गेल्या दोन वर्षांमध्ये अयोध्येला जाणाऱ्या पर्यटकांची संख्या पाहिली, तर हे देवस्थान देशात उत्पन्नाच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकावर आले आहे. अयोध्येत पर्यटनाच्या पायाभूत सुविधा निर्माण केल्याचा हा परिणाम आहे. लोकांच्या धार्मिक भावनांचा विचार करूनही पर्यटन वाढवता येते आणि लोकांच्या खिशातून अलगद पैसा काढता येतो, त्यासाठी कला लागते. देशाच्या लांब किनारपट्टीवर विविध आकर्षक समुद्रकिनारे आहेत. याव्यतिरिक्त भारतातील प्रवास बाजार आर्थिक वर्ष २०२७ पर्यंत १२५ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे, तर २०२८ पर्यंत आंतरराष्ट्रीय पर्यटकांचे आगमन ३०.५ दशलक्ष पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. २०२९ पर्यंत या क्षेत्रामध्ये अंदाजे ५३ दशलक्ष नोकऱ्या निर्माण होण्याची अपेक्षा आहे. देशाच्या जीडीपीमध्ये या उद्योगाचे थेट योगदान २०१९ ते २०३० दरम्यान वार्षिक ७-९ टक्के वाढीचा दर नोंदविण्याची अपेक्षा आहे. विमानतळ पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा आणि पासपोर्टची उपलब्धता वाढल्यामुळे आर्थिक वर्ष २०२७ पर्यंत भारतीय विमान वाहतूक बाजार अंदाजे २० अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. २०२७ पर्यंत हे प्रमाण जवळपास दुप्पट होऊ शकते. भारतीय हॉटेल बाजारपेठ आर्थिक वर्ष २०२० मध्ये ३२ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी होती आणि आर्थिक वर्ष २०२७ पर्यंत ५२ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. प्रवाशांची वाढती मागणी आणि बाजारपेठेला चालना देण्यासाठी ट्रॅव्हल एजंट्सच्या सततच्या प्रयत्नांमुळे हे अपेक्षित आहे.

महाराष्ट्राने पर्यटन विकासावर भर दिला आहे. नाशिक येथे पुढच्या वर्षी कुंभमेळा होणार आहे. त्यासाठी आतापासूनच पायाभूत सुविधांची निर्मिती केली जात आहे. सुमारे तीन हजार कोटी रुपये खर्चून विविध कामे हाती घेतली जात आहेत. आणखी निधी लागल्यास त्याचीही तयारी आहे. कुंभमेळ्यासाठी येणारे भाविक शिर्डीलाही येतात. त्यामुळे नाशिकपासून १०० किलोमीटरच्या परिसरात धार्मिक पर्यटन वाढेल, असा अंदाज आहे. त्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण केल्या जात आहेत. राज्याचे पर्यटन संचालनालय विद्यमान पर्यटन धोरण चौकटीत वाढ करण्याची आशा करीत आहे. ?'महाटुरिझम?' शाश्वत विकास आणि जबाबदार पर्यटन पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी प्रोत्साहन देत आहे. महाराष्ट्रात पर्यटकांचा ओघ वाढविण्याच्या उद्देशाने टूर पॅकेजेससाठी प्रोत्साहने द्यायला सुरुवात झाली आहे. हॉटेल व्यावसायिकांना आणि पर्यटन उद्योगाला पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल. मुंबई महोत्सवासारख्या उपक्रमांद्वारे शाश्वततेला प्रोत्साहन देत आहे. प्लास्टिकमुक्त कार्यक्रम आणि शाश्वत विकासासाठी संयुक्त राष्ट्रांसारख्या संस्थांशी सहकार्य हे पर्यावरणपूरक पर्यटन पद्धतींबद्दलची देशाची वचनबद्धता अधोरेखित करते. अलिकडेच सुरू झालेल्या ?'एएआय?' धोरणामुळेही या उपक्रमांना बळकटी मिळाली आहे. त्याचा उद्देश हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणे आणि पर्यटनात लिंग समावेशकता वाढविणे आहे. यासाठी सुमारे ३५ इरादा पत्रे आधीच जारी करण्यात आली असून धोरणाचा सक्रियपणे प्रचार केला जात आहे. त्यात लक्षणीय रस दिसून येत आहे.

महिला प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी आता सवलती दिल्या आहेत. पर्यटन मंत्रालयाचे अधिकारी दीडशे प्रस्तावांसह ५० स्थळांना अंतिम रूप देण्याची आणि विकसित करण्याची तयारी करीत आहे. भारत सरकारच्या पर्यटन महासंचालक मनीषा सक्सेना यांनी परदेशी कार्यालयांचे एकत्रीकरण, क्षमता बांधणी, स्थानिक सहभागाची भूमिका आणि मंत्रालयासाठी फायदेशीर इतर उपक्रमांबाबत तपशीलवार माहिती दिली. याव्यतिरिक्त २०२४ पर्यटन अजेंड्यामध्ये विभाग-विशिष्ट धोरणेदेखील समाविष्ट आहेत. पर्यटनातील पार्किंग समस्यांसारख्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि लोकप्रिय तीर्थस्थळांव्यतिरिक्त अष्टविनायकसारख्या कमी ज्ञात धार्मिक स्थळांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. विविध पर्यटन पोर्टफोलिओचा भाग म्हणून कृषी पर्यटन, ग्रामीण पर्यटन आणि आदिवासी पर्यटनाला सक्रियपणे प्रोत्साहन दिले जात आहे. महाराष्ट्र देशांतर्गत पर्यटकांच्या आगमनात सहाव्या क्रमांकावर तर परदेशी पर्यटकांच्या आगमनात दुसऱ्या क्रमांकावर आहे. भविष्यात महाराष्ट्र पर्यटन पारंपरिक योजनांच्या पलीकडे विस्तार करण्याचा विचार करीत आहे. वाईन पर्यटन केंद्रांनी नाशिकपाठोपाठ जुन्नर आणि सोलापूरसारख्या ठिकाणी वाईन महोत्सवांसारख्या यशस्वी उपक्रमांची पुनरावृत्ती केली. हे प्रयत्न विद्यमान पर्यटन कार्यक्रमांमध्ये वैविध्य आणण्याच्या उद्देशाने दूरदर्शी ठरतात.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# अमरावतीत बनावट नोटांचा छापखाना!

आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरावर बनावट भारतीय चलन तयार करून ते चलनात आणण्याचे रॅकेट सक्रिय असल्याचे समोर आले आहे. पण, असे रॅकेट जिल्हास्तरावरही सक्रिय असणे हे फारच धक्कादायक आहे. अमरावतीच्या नांदगाव पेठ पोलिसांनी नकली नोटांच्या प्रकरणाचा सखोल तपास केल्यानेच या रॅकेटचा भंडाफोड झाला आहे. राज्याच्या अन्य जिल्ह्यांतही बनावट नोटा चलनात आणल्याची अनेक प्रकरणे आतापर्यंत समोर आली आहेत. परंतु, स्थानिक पातळीवरच त्या तयार करायच्या आणि तेथेच चलनात आणायच्या असा प्रकार आतापर्यंत राज्यातले दोन-चार मोठे जिल्हे वगळता फारसा कुठे आढळून आला नाही. अमरावतीत तो उघड झाल्यामुळे असे रॅकेट इतरही जिल्ह्यांमध्ये कार्यरत असण्याची दाट शक्यता आहे. आता सर्व जिल्ह्यातल्या पोलिसांनी सतर्क राहून अशा टोळ्यांचा शोध घेणे आवश्यक आहे. अमरावतीत ज्यांना अटक करण्यात आली आहे, त्यांची कसून चौकशी केली तर काही धागेदोरे निश्चित हातात लागू शकतात.

नांदगाव पेठ पोलिसांना रहाटगाव परिसरात बनावट नोटा चलनात आणल्या जात असल्याची विश्वसनीय माहिती मिळाली होती. त्या आधारावर त्यांनी पहिली कारवाई १५ ऑक्टोबरला केली होती. तेव्हा तिघांना ताब्यात घेण्यात आले होते. त्यांच्याकडून २६ हजार ५०० रुपयांच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या होत्या. या तिघांची सखोल चौकशी केल्यावर प्राप्त माहितीवरून १९ ऑक्टोबरला आणखी दोघांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडे ५७ हजारांच्या बनावट नोटा होत्या. अशा एकूण ५०० च्या १६७ बनावट नोटा पोलिसांना मिळाल्या. त्याचे चलनमूल्य ८३ हजार ५०० होते. या पाचही जणांची वेगवेगळी चौकशी केल्यावर हे एक रॅकेट आहे आणि त्याचा सूत्रधारही असल्याचे समोर आले होते. विशेष म्हणजे या नोटा शहरातल्या मोठ्या दुकानांमध्ये चलनात आणल्या जात नव्हत्या. कारण, तेथे पितळ उघडे पडण्याचा धोका असल्याने या टोळीने छोटी शहरे व गावातील दुकानांमध्ये त्या चलनात आणल्याचे तपासात समोर आले. त्याचवेळी या नोटा येथेच तयार झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. तेव्हापासून नांदगाव पेठ पोलिस व गुन्हे शाखा पथक या रॅकेटच्या मुख्य सूत्रधाराच्या शोधात होते. त्यांचा अतिशय गोपनीय पद्धतीने तपास सुरू होता. अमरावतीच्या सुफीयाना नगरात सूत्रधार अब्दुल तौसिफ आला आहे, अशी माहिती दोन दिवसांपूर्वी पोलिसांना मिळताच त्यांनी छापा टाकला. चौकशी केल्यावर त्याने नकली नोटा स्वत:च तयार केल्या व अटकेतल्या इतर आरोपींना पुरवल्याचे कबूल केले. त्याच्या घराची झडतीत पोलिसांना बनावट चलन बनविण्याचा छोटा छापखानाच आढळून आला. तेथे हिरव्या रंगाचा प्लेटिंग थ्रेट, ट्रेसिंग पेपर, रबरी शिक्के, कटर, ग्लू, प्रिंटर, बॉण्ड पेपर व अन्य साहित्य आढळले. याशिवाय ५०० रुपयांच्या २० व २०० रुपयांच्या ५५ नोटा अशा एकूण २१ हजाराच्या बनावट नोटा आढळून आल्या. पोलिसांनी हे सर्व साहित्य व नोटा जप्त केल्या. उपरोक्त प्रकरणाचा तपास अधिक गुंतागुंतीचा होता. मुख्य सूत्रधार सतत ठिकाणे बदलत असल्याने त्याच्यावर नजर ठेवणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. गोपनीय माहितीची पडताळणी, तांत्रिक तपास आणि पोलिस पथकातील सदस्यांच्या समन्वयामुळे ही कारवाई यशस्वी झाली आहे. त्यामुळेच हे तपास पथक अभिनंदनास पात्र आहे. या प्रकरणात पोलिसांनी येथेच थांबू नये. सूत्रधाराची त्यांनी आणखी सविस्तर चौकशी करायला हवी. त्याला बनावट नोटा तयार करण्याचे प्रशिक्षण कुठे मिळाले व कोणी दिले? या गोरखधंद्यात त्याच्या पाठीमागे आणखी कोणी आहेत का? याचा सखोल तपास होणे आवश्यक आहे. बनावट चलन सर्वांगाने देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी घातक आहे. मोठे पाठबळ असल्यावरच असे धंदे करण्याची हिंमत येते. हे लक्षात घेऊन राज्याच्या गृहमंत्रालयाने या प्रकरणात लक्ष घालायला हवे. शक्य असेल तर एखादे विशेष तपास पथक तयार करून या प्रकरणाचा तपास व्हायला हवा. आतापर्यंत अनेक ठिकाणी झालेल्या कारवाईंचा अभ्यास करून या रॅकेटची साखळी आणखी किती लांब आहे, हे समोर येऊ शकते. अमरावतीत उघड झालेले हे प्रकरण तपास यंत्रणांनी गंभीरतेने घ्यावे, इतकीच अपेक्षा आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# गरुडपुराण

**प्रा. दिलीप जोशी**

१८ पुराणांमध्ये गरुडपुराण श्रेष्ठतम पुराण आहे.

**'यथा सुराणाम् प्रवरो जनार्दनो,**
**यथायुद्धानां प्रवरः सुदर्शनम् ।**
**तथा पुराणेशू च गारुडं च मुख्यं,**
**तदाहूर्हरीतत्त्वदर्शने ॥'**

जसा देवांमध्ये जनार्दन श्रेष्ठ, आयुधांमध्ये सुदर्शन चक्र श्रेष्ठ तसेच पुराणांमध्ये गरुडपुराण श्रेष्ठ आहे. गरुडपुराणाची अधिष्ठात्री देवता भगवान विष्णू आहेत. त्यामुळे हे वैष्णव पुराण आहे. गरुडपुराणाविषयी अनेक भ्रम आणि संभ्रम, समज-गैरसमज असल्यामुळे हे पुराण सर्वसामान्य लोक निषिद्ध मानतात. ते घरात ठेवण्यासही घाबरतात. पण हे सर्वथा चूक आहे. उलट जो मनुष्य गरुडपुराण नित्य वाचतो तो ऐहिक सुखासोबत पारलौकिक मोक्षाचाही अधिकारी बनतो. त्यामुळे गरुडपुराण घरात ठेवू नये, नित्य वाचू नये, घरात मृत्यू झाला असेल तरच वाचावे हे सर्व गैरसमज आहेत. उलटपक्षी गरुडपुराण अभ्यासाने आपल्याला जीवनमूल्यांचे महत्त्व कळते. पारमार्थिक महत्त्व कळते आणि कर्तव्य भावना निर्माण होते. आत्मकल्याणाचा मार्ग तर कळतोच; ऐहिक आणि पारलौकिक सुखाचा मार्गही प्रशस्त होतो. म्हणून हे पुराण घरात असावे, त्याचे नित्य पठन अथवा श्रवण असावे. गरुडपुराणाबाबत गैरसमज नसावा.

गरुडपुराणाचे साधारणतः १९ हजार श्लोक आहेत. पैकी ८००० श्लोक सर्वज्ञात आहेत. २७५ विषय असलेल्या गरुडपुराणाचे मुख्यतः तीन खंडात विभाजन केले आहे. १) पूर्वखंड २) उत्तरखंड ३) ब्रह्मखंड या तीन खंडांना कांडानुसार नावे दिली आहेत. पूर्वखंडाला आचार कांड, उत्तर खंडाला धर्मकांड तर ब्रह्मखंडाला ब्रह्मकांड म्हणतात. आचार कांडात सृष्टिनिर्माण, भक्त ध्रुवाचे चरित्र, बारा आदित्यांची कथा, सूर्य-चंद्रासहित ग्रहांची उपासना विधी, भक्ती, ज्ञान, वैराग्य, सद्आचार, सद्विचार याचा विचार आहे. सोबतच तप, दान, यज्ञ, तीर्थसेवन, सत्कर्म अनुष्ठान आणि त्यांचे फळ याचा विचार आहे. याच खंडात व्याकरण, छंद, स्वर, ज्योतिष, आयुर्वेद याचाही विचार मांडला आहे.



गरुडपुराणातील दुसरा खंड आहे उत्तरखंड. याला धर्मकांड म्हणतात. हा गरुडपुराणाचा गाभा आहे. यात प्रेतकल्पाचे विवेचन आहे. मरणासन्न व्यक्ती असेल तर त्याच्या मोक्षासाठी विविध विधी दान सांगितले आहेत. मृत्यूनंतर दाह संस्कार, पिंडदान, श्राद्ध, सापिंडी, कर्मविपाक या सोबतच आत्मज्ञान प्रतिपादित केले आहे. याच पुराणातील तिसरे ब्रह्मकांड असून यात गरुडपुराण माहात्म्य, श्रीकृष्ण कथा, भगवान श्रीकृष्णाद्वारा गरुडाला विष्णू महिमा कथन इत्यादी आहे.

**याला गरुडपुराण का म्हणतात?** : आपली आई विनताला नागांनी कैद केल्यामुळे तिच्या सुटकेसाठी पक्षिराज गरुडाने भगवान श्रीहरीची तपश्चर्या केली. भगवान प्रसन्न झाले. त्याने वर मागितल्यावर भगवान श्रीहरींनी त्याला विष्णू माहात्म्य असलेली पुराण संहिता पारायण सांगितले. गरुडांनी ती पठन केल्यामुळे त्या पुराण संहितेला 'गरुडपुराण' हे नाव पडले. पुढे हेच पुराण गरुडांनी कश्यप ऋषींना कथन केले. गरुडांनी कश्यप ऋषींना सांगितले म्हणूनही गरुडपुराण. खरं म्हणजे गरुडपुराणात केवळ अंत्यसंस्कार, पिंडदान वगैरेच आहे, असा अनेकांचा समज नसून या पुराणात ध्यानयोग आहे. सूर्य पूजन, सुदर्शन पूजन, विविध विधींवर चर्चा आहे. सर्प विषापासून इतरही विषबाधेवर मंत्र साधना आहे. शाळिग्रामपासून ते विविध रत्न परीक्षा दिल्या आहेत. विविध रोगांवरील उपाययोजना सांगितल्या आहेत; ज्यात हृदरोग, कुष्ठरोग, वात-पित्त-ज्वारादी रोग, मूत्ररोगापासून अनेक रोगांवरील उपाय तसेच वैद्यकशास्त्राची परिभाषा दिली आहे. याच पुराणात व्याकरण शास्त्र आहे. नित्य श्राद्ध, वृद्धी श्राद्ध, एकोद्दिष्ट श्राद्ध यांचाही विचार आहे. याच पुराणात मरणासन्न अवस्था, मरणोपरांत यावेळीचे विधी, स्वर्गलोक, नरकलोक यावरही प्रतिपादन आहे. अकाल मृत्यू, दानाचे महत्त्व अशा अनेक बाबींचा विचार गरुडपुराणात आहे. याशिवाय भगवान श्रीकृष्ण, श्रीहरी विष्णू, देवी महालक्ष्मीचे विविध अवतार वर्णन, भगवान शेष, भगवान रुद्र अवतार, सूर्यपुत्री कालिंदी, सोमपुत्री जांबवंती यांचेही वर्णन आहे.

थोडक्यात या पुराणात वेद, श्रुती, योग, याग, विधी आहेत. सृष्टीची उत्पत्ती, भारतवर्ष वर्णन आयुर्वेद, औषधी शास्त्र, प्रेतकल्प, प्रेतमुक्ती इत्यादी बाबी आहेत. गरुडपुराण प्रासादिक, सर्व मंगल आणि सकारात्मक ग्रंथ असून त्याचे नित्य वाचन करण्यास काहीही हरकत नाही. तो घरात ठेवावा, तो अभ्यासावा. त्याला काळ वेळेचे बंधन नाही. तो शुभ ग्रंथ असून त्याच्याविषयी कोणताही गैरसमज नसावा. इतर पुराणांप्रमाणेच गरुडपुराणही पवित्र, शुभ आणि ऐहिक सुखासोबत पारलौकिक सुख देणारे पुराण आहे.

९८२२२६२७३५

## आजचे संघगीत-६१

बुधवार, ३ डिसेंबर २०२५

### हिंदु आम्ही भीति कुणाची जगती आम्हाला

हिंदु आम्ही भीति कुणाची जगती आम्हाला
भगवा ध्वज हा प्राण आमुचा जीवनपुष्पे पुजु या त्याला ॥धृ.॥

वीर शिवाजी बंदा बाजी प्रताप तानाजी होऽ प्रताप तानाजी
प्राण अर्पुनी वैभव दिधले अपुल्या हिंदूधर्माला ॥१॥

हिंदू भाग्य आमुचे हिंदु जन्मलो हिंदुस्थानात, होऽ हिंदुस्थानात
हिंदू गर्जत गर्जत करु या पावन जगताला ॥२॥

गडी सवंगडी साथ घेउनी करु या मेळावा, होऽ करु या मेळावा
हिंदुत्वाची विजयपताका नेउनि भिडवू गगनाला ॥३॥

काळाची ना कदर अम्हाला वीर खडे राहू होऽ वीर खडे राहू
अभंग धैर्ये ठाण मांडुनी खेचुनि आणू विजयश्रीला ॥४॥

उज्ज्वलतेच्या परंपरेला जागवु हृदयात होऽ जागवु हृदयात
मातृभूमिच्या मंगल भाली लावू सुभाग्य तिलकाला ॥५॥

संघटनेचे जीवन जगुनी स्वधर्महित साधू होऽ स्वधर्महित साधू
केशव केशव नामोच्चारे गाठू वैभव शिखराला ॥६॥

## वाचक पत्रे

### बिहार निवडणुकीचा धडा

बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपसह रालोआने अपेक्षेपेक्षाही अधिक यश मिळवल्यामुळे विरोधी पक्षांचे धाबे दणाणले आहे. बिहारवासीयांनी, तेथील सर्वधर्मीय मतदारांनी रालोआच्या पारड्यात भरघोस मते देऊन 'जो देशहित की बात करेगा, वही देश पर राज करेगा' या तत्त्वाला पाठिंबा दिला आहे. निवडणूक काळात जनताजनार्दनाला उघड आणि जाहीर धमक्या देणाऱ्या तेजस्वी यादव यांना गाशा गुंडाळावा लागला. काँग्रेसची अवस्था तर अपेक्षेपेक्षाही जास्त बिकट झाली. या निकालानंतर देशभरातील इंडिया आघाडीच्या नेत्यांच्या झोपा उडाल्या आहेत. त्यातही राहुल गांधी आणि अखिलेश यादव यांचे राजकीय भवितव्य धोक्यात आले आहे. पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी हैराण झाल्या आहेत. एसआयआरला अपशकुन करण्यासाठी आणि घुसखोरांना वाचवण्यासाठी साम, दाम, दंड आणि भेद या मार्गांचा वापर करून एसआयआरबद्दल जनतेची दिशाभूल केली जात आहे. सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊनही या नेत्यांचे हीन राजकारण सुरूच आहे. तरीही राष्ट्रीय निवडणूक आयोगाने आपल्या संवैधानिक कर्तव्यपूर्तीचा विडा उचलला आहे. मृत झालेले, दुबार नोंदणी असलेले, जागा बदलून गेलेले आणि भारताचे नागरिक नसलेले मतदार निवडणूक मतदारयादीत ठेवणे संविधानाच्या विरोधात आहे. अशांची नावे मतदारयादीतून वगळली गेलीच पाहिजेत. बेकायदेशीर घुसखोरांचे समर्थन करणाऱ्या, त्यांना सर्व प्रकारच्या सरकारी सुविधा पुरवणाऱ्या, त्यांना आधार कार्ड-रेशन कार्ड-मतदार ओळखपत्र आणि पॅन कार्ड देऊन मतदारयादीत घुसवणाऱ्या देशविरोधी घटकांविरोधात कडक कायदेशीर कारवाई केली पाहिजे. एसआयआर प्रक्रियेत विघ्न आणणाऱ्या घटकांनाही कायद्याचा हिसका दाखवला पाहिजे. असे केल्याशिवाय भारतीयांना न्याय मिळणार नाही.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### चांदीच्या दत्त बालमूर्तीची प्राणप्रतिष्ठा

पारतंत्र्याच्या काळात १९३२ साली जबलपूरसारख्या हिंदी भाषी प्रांतात 'वंदे मातरम'च्या प्रेरणेतून श्री दत्त भजन मंडळाची स्थापना झाली. जबलपूर येथील श्री दत्त भजन मंडळात श्री दत्ताची सुंदर विग्रह असलेली मूर्ती दर्शनीय आहे. त्यामुळे अर्थातच इथे सृष्टीचे उत्पादक, पालक, संहारक, सत्त्व-रज-तम त्रिगुणात्मक रूपात विराजमान आहेत. धर्म, अध्यात्म आणि सांस्कृतिक मूल्यांना जपणारी ही एक अग्रणी संस्था असून, मराठी माणसाचे श्रद्धास्थान आहे. इथे कीर्तन, प्रवचन आणि व्याख्यानांच्या माध्यमातून भक्तीचा झरा नेहमीच पाझरत असतो. अशा या मंडळाच्या ९४ वर्षांच्या समृद्ध गौरवशाली परंपरेतील मोहनमाळेत अजून अजून एक नवीन मोती गुंफला जात आहे आणि तो मोती म्हणजे बाल दत्ताच्या रौप्यमूर्तीची प्राणप्रतिष्ठा. श्रीदत्त जन्मोत्सवाच्या प्रसंगी ही बालमूर्ती पाळण्यात आपल्या रूपाची प्रभा पसरवणार आहे.



या अनुषंगाने जबलपुरात शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. मोठ्या संख्येने मराठी माणसाने यात भाग घेतला. धार्मिक आयोजनासोबत संस्था गरीब विद्यार्थी सहायता, नि:शुल्क होमिओपॅथिक औषधालय, परप्रांतातून येणाऱ्या मराठी माणसासाठी अल्प दरात उत्तम राहण्याची व्यवस्था, असे प्रकल्प राबवते.

**अभय गोरे**/९८९३७१९२७८

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# निळकंठेश्वर कारखान्यातील साखर पोत्याचे पूजन

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, ३ डिसेंबर :** अनेक वर्षांच्या प्रतिक्षेनंतर किल्लारी



येथील निळकंठेश्वर साखर कारखान्याचे नूतनीकरण करुन सुरु करण्यात आलेल्या पहिल्याच गाळप हंगामात उत्साहवर्धक कामगिरी करत तब्बल १८ हजार मेट्रिक टन ऊस गाळप पूर्ण केले आहे. या ऐतिहासिक आनंद व्यक्त करत हंगामातील पहिल्या साखर पोत्याचे पूजन आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते विधीवत पार पडले.

संतोष बेंबडे, कार्यकारी संचालक डी. एल. पतंगे, सेक्रेटरी तुकाराम पवार,व्ही एस आय चे शास्त्री, चिंफ इंजिनिअर भोसले, चिंफ केमीस्ट आण्णासाहेब मोरे, चिप अकाऊंट संतोष वाडीकर, मुख्य शेतकी अधिकारी कल्याण शिंदे, ऊस पुरवठा अधिकारी युवराज धुमाळ, सिव्हिल इंजिनिअर गणेश शिंदे आदी उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षांपासून बंद पडलेल्या कारखान्याला पुन्हा सुरू करण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी सातत्याने पाठपुरावा करत अथक परिश्रम घेतले. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याने कारखान्याचे संपूर्ण आधुनिकीकरण करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञान, नव्या सुविधा आणि गाळपक्षमता वाढवून कारखाना आता पूर्ण क्षमतेने कार्यरत झाला आहे.दोन जिल्हे आणि चार तालुक्यांतील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी हा कारखाना पुन्हा सुरू होणे म्हणजे मोठा दिलासा आहे.

वाहतूक खर्चात बचत, वेळेवर गाळप आणि योग्य दर मिळण्याची हमी यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान निर्माण झाले आहे. स्थानिक अर्थव्यवस्थेलाही या कारखान्यामुळे नवसंजीवनी

**आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते संपन्न**

मिळत असून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत.

या गाळप हंगामात सुमारे तीन लाख मेट्रिक टनांपेक्षा अधिक ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून सुरुवातीपासूनच गाळपाचा वेग समाधानकारक आहे. कारखान्याच्या सुरूवातीमुळे ग्रामीण भागात औद्योगिक विकासाला चालना मिळणार असून किल्लारी परिसरातील शेतकरीहितासाठी हे पाऊल ऐतिहासिक ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

# 'कै. रसिका' महाविद्यालयाच्या खेळाडूंची अॅथलेटिक्स संघात निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**देवणी, ३ डिसेंबर :** कै. रसिका महाविद्यालयातील गीते पिराजी (इ.उे ऋध ), आरती टिंगरे (इ.उे डध) , अश्रिवनी स्वामी( इ.उजचए ढध) या तीन खेळाडूची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या थलेटिक्स संघात निवड झालेली आहे.

२७ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धा दिनांक २ ते ८ डिसेंबर २०२५ या कालावधीमध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कॅम्पस मध्ये येथे होत आहेत. या स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी गीते पिराजी, आरती टिंगरे, स्वामी अश्विनी या विद्यापीठ संघात निवड झाली आहे.

या खेळाडूस प्रा.डॉ. सचिन चामले यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या खेळाडूंची विद्यापीठ संघात निवड झाल्याबद्दल संस्थाध्यक्ष गोविंदराव भोपणीकर, सचिव गजानन भोपणीकर, व सर्व संस्था पदाधिकाऱ्यांतर्फे तसेच प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक



व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केलेले आहे. व पुढील स्पर्धेसाठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या आहेत.

# सहकारमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त महारक्तदान शिबिर



**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, ३ डिसेंबर :** येथील काकी प्रतिष्ठानच्या वतीने राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त प्रती वर्षाप्रमाणे याही वर्षी ५ डिसेंबर रोजी शिरूर ताजबंद येथील इंद्रायणी निवासस्थानी महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या महारक्तदान शिबिरात रक्तदान करणाऱ्या व्यक्तीचा वैयक्तिक

५ लाख रुपयाचा अपघाती विमा काकी फाउंडेशनच्या वतीने काढण्यात येणार असल्याची माहिती सिद्धी शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश जाधव व शिरूर ताजबंदचे उपसरपंच सुरज पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे दिली आहे.

लातूर जिल्ह्यातील सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्यावर प्रेम करणाऱ्या तमाम नागरिकांनी या रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवावा असे आवाहन सिद्धी शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश जाधव व शिरूर ताजबंद चे उपसरपंच सुरज पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# येरोळ-जांभळवाडीमध्ये श्री दत्त जन्मोत्सव सोहळ्याला सुरुवात

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, ३ डिसेंबर :** येरोळ, जाभंळवाडी (ता. शिरुर अनंतपाळ) येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री अवधूत सिद्धी संस्थानतर्फे मंगळवार, दि. २ पासून श्री दत्त जन्मोत्सव सोहळ्याची मंगल सुरुवात झाली. मंगळवारी सकाळी आठ वाजता 'श्री दत्त महात्म्य' पारायणाने उत्सवाची सुरुवात झाली. रात्री साडेआठ ते अकरा या वेळेत श्री हरिभक्त परायण बंडा महाराज अलगरवाडीकर यांचे भक्तिमय कीर्तन रंगले.

बुधवारी सकाळी बेलेश्रूवर महादेवाचे रुद्राभिषेक आचार्य श्री सचिन देव जोशी व ब्रह्मावृंद यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार असून, रात्री साडेआठ वाजता श्री हरिभक्त परायण संदिपान महाराज सुमठाणकर यांचे कीर्तन होईल.

गुरुवारी श्री अवधूत स्वामी अभिषेक, श्री दत्तमाला मंत्र हवन, तसेच दुपारी बारा वाजता श्री हरिभक्त परायण महादेव महाराज लिंबवाडीकर यांचे गुलालाचे व श्री दत्त जन्मोत्सवाचे कीर्तन होणार आहे.

या पवित्र महापर्वणीचा पंचक्रोशीतील सर्व भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री अवधूत सिद्धी संस्थानचे प्रमुख ह.भ.प. सुरेश महाराज सारसेकर यांनी केले आहे. भक्ती, श्रद्धा आणि परंपरेची सांगड घालत यंदाचा दत्त जन्मोत्सव सोहळा भक्तिमय वातावरणात साजरा होत आहे.

# क्रीडा मशाल ज्योतीचे म.गांधी महाविद्यालयात स्वागत

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, ३ डिसेंबर :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे ४ ते ८ डिसेंबर २०२५ दरम्यान राज्यस्तरीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, त्यानिमित्ताने लातूर जिल्ह्यात आलेल्या क्रीडा मशाल रॅलीचे स्वागत येथील महात्मा गांधी महाविद्यालयात करण्यात आले. राज्यस्तरीय क्रीडा महोत्सवाविषयी विद्यापीठ परिक्षेत्रातील खेळाडू व क्रीडा प्रेमींमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी दिनांक ३० नोव्हेंबर ते ३ डिसेंबर २०२५ या कालावधीत क्रीडा ज्योत मशाल रॅलीचे हिंगोली, परभणी, नांदेड व लातूर जिल्ह्यात आयोजन करण्यात आले आहे.

त्यानिमित्ताने विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक प्रा. डॉ. मारुती गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली सदरील रॅलीचे लातूर जिल्ह्यात सोमवार दिनांक १ डिसेंबर रोजी महात्मा महाविद्यालयात आगमन झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार यांच्या हस्ते रॅलीचे स्वागत करण्यात आले. तसेच नशामुक्त भारताची शपथ घेण्यात आली.

लातूर जिल्हा रासेयो डॉ यादव सूर्यवंशी, राष्ट्रीय सेवा




समन्वयक प्रा. डॉ. बालाजी होकरणे, महाविद्यालयातील संस्थेचे प्रतिनिधी प्रा. हेमंत पाटील, स्टाफ सेक्रेटरी प्रो. डॉ. ए. पी. कांबळे, प्रसिद्धी प्रमुख योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. बालाजी माकणे-पाटील, डॉ. प्रकाश देशमुख, एन.सी.सी. प्रमुख डॉ. श्रीमती ए. एम. शिंदे, प्रा. जी. व्ही. ताटे, प्रा. प्रकाश डवरे, डॉ. एस. बी. शिंदे, डॉ. ए. आर. कराड, डॉ. व्ही. पी. शेळके, डॉ. एस. आर. होळकर, विशाल करंजे, सिद्धेश्वर चोथवे, शंकर शेळके, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी-विद्यार्थी उपस्थित होते.

# सहकारमंत्र्याच्या वाढदिवसानिमित्त रक्तदात्याचा काढणार पाच लाखांचा विमा



**चाकूर, २ डिसेंबर :** सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त महारक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असून काकी फाऊंडेशनच्या वतीने रक्तदात्याचा पाच लाखांचा अपघाती विमा काढण्यात येणार असल्याची माहिती सिद्धी शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश जाधव व शिरूर ताजबंदचे उपसरपंच सुरज पाटील

**काकी फाऊंडेशनचा उपक्रम; अविनाश जाधव, सुरज पाटील यांची माहिती**

यांनी दिली आहे.

राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा वाढदिवस ५ डिसेंबर रोजी असून या वाढदिवसानिमित्त प्रती वर्षाप्रमाणे याही वर्षी शिरूर ताजबंद येथील इंद्रायणी निवासस्थानी महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या महारक्तदान शिबिरात रक्तदान करणाऱ्या व्यक्तीचा वैयक्तिक ५ लाख रुपयाचा अपघाती विमा काकी फाउंडेशनच्या वतीने काढण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्यावर प्रेम करणाऱ्या तमाम नागरिकांनी या रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवावा असे आवाहन सिद्धी शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश जाधव व शिरूर ताजबंद चे उपसरपंच सुरज पाटील यांच्या वतीने एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

# सम्राट चंद्रगुप्त मौर्य इंटरनॅशनल स्कूलमध्ये आनंद नागरी



**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, ३ डिसेंबर :** सम्राट चंद्रगुप्त मौर्य इंटरनॅशनल स्कूल, रुद्धा ता.अहमदपूर येथे रोजी आनंद नगरी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून श्री.गणेश शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक कुलदीप भैय्या हाके आणि संचालिका सौ. शिवालिका हाके उपस्थित होत्या. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अहमदपूर पोलीस स्टेशनच्या पीएसआय अस्मिता जाधव व पोलीस उपनिरीक्षक देवकते आणि संस्थेच्या उपाध्यक्षा मानसीताई हाके यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

पीएसआय अस्मिता जाधव यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व तसेच विद्यार्थ्यांनी वेगवेगळी वेशभूषा परिधान करून विद्यार्थ्यांनी ठेवलेल्या वेगवेगळ्या पदार्थांचा आस्वाद घेण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजया जाधव यांनी केले व तसेच आभार प्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक हरिदास

# 'क्रीडा ज्योत मशाल रॅली'चे मातृभूमी महाविद्यालयात स्वागत



**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ३ डिसेंबर :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड च्या वतीने २७ वा महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव दि. ४ ते ८ डिसेंबर २०२५ या दरम्यान आयोजित करण्यात आला असून, या क्रीडा महोत्सवाच्या मशाल रॅली चे स्वागत मातृभूमी महाविद्यालयात करण्यात आले.

यावेळी मशाल रॅलीचे प्रमुख स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या राष्ट्रीय सेवा योजनेची संचालक डॉ. मारोती गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना व क्रीडा विभागाच्या वतीने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने काढलेल्या रॅलीच्या माध्यमातून नारीचा सन्मान, राष्ट्राचा अभिनान' स्त्री आत्मनिर्भर -देश प्रगतीपथावर ही रॅली चार जिल्ह्यात जात आहे. या मशाल रॅलीचे स्वागत, प्राचार्या उषा कुलकर्णी ,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा बिभीषण मद्देवाड यांनी केले.

या वेळी प्राचार्या उषा कुलकर्णी म्हणाले जी स्त्री स्वतःचे निर्णय स्वतः घेते, आर्थिक, मानसिक, सामाजिक आणि भावनिकदृष्ट्या सक्षम असते आणि स्वतःची ओळख स्वतः निर्माण करते - तिला आत्मनिर्भर नारी म्हणतात. आत्मनिर्भर नारी ही घर, समाज आणि राष्ट्र या तिन्हींच्या प्रगतीचा कणा आहे. ती शिक्षण, कौशल्य, आत्मविश्वास आणि धैर्याच्या जोरावर स्वतःचा मार्ग तयार करते. ती इतर स्त्रियांनाही प्रेरित करते, आणि समाजाला योग्य दिशा देते. आत्मनिर्भर नारी म्हणजे सामर्थ्य, स्वाभिमान आणि सकारात्मक बदलाची ताकद.

यावेळी मातृभूमी महाविद्यालयातील प्रा सय्यद उस्ताद, प्रा. रणजित मोरे, प्रा. शितल पवार, प्रा शिवांगी वट्टमवार, काळे अस्विनी, प्रा काकरे प्रतीक्षा, ग्रंथपाल उषा सताळकर, रामकिशन भोसले, मादळे प्रदीप, दीपक रणदिवे, दयानंद टाके, विवेक देवर्षे, मयुर मुळे, संगीता दुडे, सय्यद सिमा, प्रकाश गायकवाड, जगदिशा ओंकारे, मुबारक पटेल, अर्चना बिरादार यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

# रेणापूर तालुक्यात थंडी वाढली

**त.भा. वृत्तसेवा,**

**रेणापूर, ३ डिसेंबर :** रेणापूर शहर परिसरासह तालुक्यात थंडीचा कडाका चांगला वाढल्याचे दिसून येत आहे. वाढत्या थंडीने नागिरकांत सर्दी तापाचे रुग्णही वाढीस लागले आहेत.

मागच्या आठवडाभरापासून थंडीचा गारठा बऱ्यापैकी वाढला आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी आपले ठेवणीतील गरम कपडे, स्वेटर-कानटोप्या, मफलर बाहेर काढले असून सायंकाळच्या सुमारास शहर व परिसरात उघड्या डोक्याने कोणीही फिरताना दिसत नाही. वाढत्या थंडीचा फायदा रब्बी पिकांना चांगलं होणार असून त्यामुळे हरभरा, गहू -ज्वारीचे पीक यंदा जोमात येण्याची शक्यता असल्याचे शेतकऱ्यातून बोलले जात आहे. ही कडाक्याची थंडी कायम राहण्याची शक्यता आहे.

# मराठवाडास्तरीय पत्रकारिता पुरस्कारासाठी, प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ३ डिसेंबर :** उदगीर तालुका पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी दिला जाणाऱ्या मराठवाडास्तरीय पत्रकारिता पुरस्काराचे आयोजन केले आहे. शोध वार्ता व उत्कृष्ट वार्ता या दोन गटातील पुरस्कारासाठी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन उदगीर तालुका पत्रकार संघाकडून करण्यात आले आहे.

उदगीर तालुका पत्रकार संघाच्या वतीने मागच्या सतरा वर्षापासून मराठवाडा विभागीय पत्रकारिता पुरस्काराचे आयोजन करण्यात येत असुन पुरस्काराचे हे १८वे वर्ष आहे. उत्कृष्ट वार्ता व शोधवार्ता या दोन गटात आयोजित स्पर्धेत, दैनिकाच्या प्रतिनिधींनी १ डिसेंबर २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत नावासह प्रकाशित

झालेली बातमी किंवा बातमीसोबत नाव नसल्यास संपादकाचे शिफारस पत्र आणि प्रकाशित साहित्याची मूळ प्रत आणि तीन साक्षांकित प्रत व वार्ताहरचे दोन पासपोर्ट फोटो, कोणत्या गटासाठी प्रवेशिका पाठवत आहे, त्याचा स्पष्ट उल्लेख पॉकेटवर लिहून स्पर्धकांनी आपल्या प्रवेशिका २५ डिसेंबर २०२५ पर्यंत

उदगीर तालुका पत्रकार संघ, द्वारा दैनिक यशवंत विभागिय कार्यालय, नगर परिषद व्यापारी संकुल, ई बिल्डिंग पहिला मजला,

उदगीर जिल्हा लातूर (पिन कोड ४१३५१७) या




पत्त्यावर पाठवाव्यात. या अगोदर पुरस्कार प्राप्त झालेल्या पत्रकारांनी परत प्रवेशिका पाठवू नये असे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना उत्कृष्ट वार्ता गटात प्रथम पुरस्कार जेष्ठ पत्रकार कै. महादप्पा मुद्दा यांच्या स्मरणार्थ अर्जुन मुद्दा यांच्यावतीने रोख पाच हजार रुपये, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र असे स्वरूप आहे. द्वितीय पुरस्कार स्वामी विवेकानंद महाविद्यालय वृत्तपत्र विद्या विभाग यांच्या वती वतीने तीन हजार रुपये, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र, तर तृतीय पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार कै. अनंत आपसिंगेकर यांच्या स्मरणार्थ दोन हजार रुपये, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, तसेच शोध वार्ता गटात प्रथम पारितोषिक कै. महादप्पा मुद्दा यांच्या स्मरणार्थ अर्जुन मुद्दा यांच्या वतीने रोख पाच हजार रुपये, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक वृत्तपत्र विद्याविभाग स्वामी विवेकानंद महाविद्यालय

यांच्यावतीने तीन हजार रुपये, प्रमाणपत्र, तृतीय पारितोषक कै. व्यंकटराव कलप्पा मोगले यांच्या स्मरणार्थ रोख दोन हजार रुपये, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. ऊत्कृष्ठ वार्ता व शोधवार्ता गटातील स्पर्धेसाठी मराठवाड्यातील पत्रकारानी प्रवेशिका पाठवाव्यात असे आवाहन उदगीर तालुका पत्रकार संघाच्या वतीने अध्यक्ष राम मोतीपवळे, कार्याध्यक्ष एल.पी. उगीले, स्पर्धेचे संयोजक प्रा. प्रविण जाहूरे , बालाजी कवठेकर यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पात्र व्यक्तींनी इस्राईलला जाण्यासाठी संकेत स्थळावर नोंदणी करावी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ डिसेंबर**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत इस्राईल देशात Renovation Construction रोजगाराची संधी महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने (EAC) राज्यामध्ये जास्तीत जास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याची शिफारस केली आहे, जेणेकरून महाराष्ट्र राज्य १ ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे यशस्वी वाटचाल करू शकेल. यामध्ये आतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासह बांधकाम, आरोग्य व इतर क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करण्यावर भर देण्यात आला आहे. यासाठी करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी, एक असलेल्या इस्राईल आणि भारत यांच्यातील कराराद्वारे रोजगाराच्या संधी निर्माण करणे, या अंतर्गत इस्राईल देशात Henovation Construction या क्षेत्रात

खालीलप्रमाणे नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत.

Plastering Work (१००० जागा)र
२. Ceramic Tiling (१००० जागा)
३. Drywall Worker (३०० जागा)
४. Mason (३०० जागा)

त्या करिता पात्रता निकष पुढील प्रमाणे आहेत.

१. इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे (वाचन, लेखन आणि बोलणे).
२. किमान शैक्षणिक पात्रता १० वी उत्तीर्ण,
३. वय वर्षे २५ ते ५० वयोगटाचे उमेदवार या योजनेमध्ये सहभागी होण्यास पात्र आहेत.
४. किमान आवश्यक अनुभव किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक नूतनीकरणाच्या अंतर्गत कामात तज्ज्ञ असणे आवश्यक आहे.
५. नोकरीचे स्थान - इस्रायलमध्ये कुठेही.

अधिकाधिक संख्येने इच्छुक पात्र व्यक्तींनी इस्राईलला जाण्यासाठी https://maharashtrainternational.com या संकेत स्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन कौशल्य विकास अधिकारी स. आ. किरवले यांनी केले आहे.

# अहिल्यानगर - बीड - अहिल्यानगर डेमूच्या वेळेत सुधारणा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ डिसेंबर**

मध्य रेल्वे, पुणे विभागाने ०८.१२.२०२५ पासून ट्रेन क्रमांक ७१४४१ / ७१४४२ अहिल्यानगर - बीड - अहिल्यानगर डेमू (आठवड्यातून सहा दिवस) च्या वेळेत सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. सविस्तर सुधारित वेळा (PTT) खालीलप्रमाणे आहेत:

१. ट्रेन क्रमांक ७१४४१ अहिल्यानगर - बीड डेमू
ही ट्रेन अहिल्यानगरहून सकाळी ७.४५ वाजता निघेल. मार्गावरील स्थानकांवर आगमन आणि निर्गमनाच्या वेळा खालीलप्रमाणे आहेत:

नारायणडोहो: ०७.५७ / ७.५८ तास
नवीन लोणी: ०८.१५ / ०८.१६ तास
सोलापूरवाडी: ०८.३४ / ०८.३५ तास
नवीन धानोरा: ०८.५४ / ०८.५५ तास
कडा: ०९.०१ / ०९.०२ तास
नवीन आष्टी: ०९.२७ / ०९.२८ तास
वेताळवाडी : ०९.४७/०९.४८ तास
हातोला: १०.०२ / १०.०३ तास
अमळनेर भांड्याचे: १०.२४ / १०.२५ तास
जतननादूर: १०.४८ / १०.४९ तास
विघनवाडी : ११.२७/११.२८ तास
रायमोहा: ११.४४ / ११.४५ तास
राजुरी: ११.५९ / १२.०० तास

ही गाडी बीड येथे १२.३० वाजता पोहोचेल.

२. गाडी क्रमांक ७१४४२ बीड - अहिल्यानगर डेमू
ही गाडी बीड येथून दुपारी १.०० वाजता निघेल. मार्गावरील स्थानकांवर आगमन आणि निर्गमनाच्या वेळा खालीलप्रमाणे आहेत:

राजुरी: १३.०६ / १३.०७ तास
रायमोहा: १३.२७ / १३.२८ तास
विघनवाडी: १३.४३ / १३.४४ तास
जतननादूर: १४.११ / १४.१२ तास
अमळनेर भांड्याचे: १४.४८ / १४.४९ तास
हातोला: १५.१० / १५.११ तास
वेताळवाडी : १५.२४ / १५.२५ तास
नवीन आष्टी: १५.४४ / १५.४५ तास
कडा: १६.०६ / १६.०७ तास
नवीन धानोरा: १६.१४ / १६.१५ तास
सोलापूरवाडी: १६.३७ / १६.३८ तास
नवीन लोणी: १६.५४ / १६.५५ तास
नारायणडोहो: १७.१२ / १७.१३ तास

ही ट्रेन अहिल्यानगर येथे १७.४५ वाजता पोहोचेल.

प्रवाशांना विनंती आहे की त्यांनी प्रवास सुरू करण्यापूर्वी सुधारित वेळेची नोंद घ्यावी.

## सावरकर महाविद्यालयामध्ये गीता जयंती निमित्त
# भक्तियोगाचे सामूहिक पठण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ डिसेंबर**

मार्गशीर्ष शुक्ल पक्षातील मोक्षदा एकादशी या दिवशी भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला भगवद्गीतेचे ज्ञान दिले. हा दिवस ' गीता जयंती' म्हणून स्वा. सावरकर महाविद्यालयात मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई शालेय पातळीवर आभासी माध्यमातून सामूहिक गीता पठणाचा विक्रम बनवत असताना त्या सोबतच महाविद्यालयात प्राचार्य डॉ सुहास मोराळे यांच्या अध्यक्षते खाली आणि डॉ ना. सी. धर्माधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी गीतेतील १२ व्या अध्याय डॉ. कृष्णा रामदासी यांच्या पुढाकाराने सर्वांनी सामुदायिकरित्या पठण केले. या नंतर ' कृष्णा इज विथ यू: ए ग्रेट सायकॉलॉजिकल सपोर्ट ' हा उपक्रम घेण्यात आला. दैनंदिन जीवनातील मानवी मनाच्या अवस्थांचा विचार करता जसे आनंद, शांत, राग, चिंता, दुःख, सुरक्षित, आळस, एकटेपणा यातील सकारात्मक मानसिक अवस्था अजून वृद्धिंगत करण्याच्या दृष्टिकोनातून आणि नकारात्मक अवस्थांपासून परावृत्त करून सकारात्मक आणि कार्यसक्षम बनवण्याच्या दृष्टिकोनातून उपयुक्त असे गीतेतले श्लोक अर्थासह निवडून ते विशिष्ट रंगाच्या चिठ्ठ्यांवर छापून ते आपल्या त्या वेळेसच्या मनस्थिती प्रमाणे आपण वाचावेत आणि आपली मनस्थिती सुधारून कार्यक्षमता वाढावी असा या उपक्रमाचा हेतू होता. या उपक्रमात प्रमुख अतिथी, प्राचार्य, उपप्राचार्य, विद्यार्थी सर्व प्राध्यापकांनी सहभाग घेतला. प्रसंगी डॉ.धर्माधिकारी असे म्हणाले गीता आपल्या भारतीय संस्कृतीची माता आहे. ती प्रत्येकासाठी आहे आणी सर्वत्र आचरणात आणली जाऊ शकते.

प्राचार्य डॉ सुहास मोराळे यांनी भगवद्गीता हा ग्रंथ जीवनातील सत्य कर्तव्य आणि योग्य मार्गाचे दर्शन घडवणारा एक उत्कृष्ट आणि अंतिम मार्गदर्शक आहे. अशा उपक्रमातूनच विद्यार्थीमध्ये गीते प्रति आकर्षण, संस्कृतचे ज्ञान वाढेल, अध्यात्म आणि भारतीय तत्त्वज्ञानांबद्दल गोडी निर्माण होईल असे आपले मत व्यक्त केले. डॉ. कृष्णा रामदासी यांनी गीता अध्यायाचे पठण केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर व डॉ उत्तम साळवे, सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन आणि सूत्रसंचालन ग्रंथपाल डॉ. अनुजा कास्तीकर यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री सचिन चौरे,श्री बाळासाहेब वाघमारे यांनी प्रयत्न केले.

## श्री संत ज्ञानेश्वर गुरुकुल विद्यामंदिर ची अविस्मरणीय शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न!

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३ डिसेंबर**



केज नगरीतील शैक्षणिक क्षेत्रात अद्वितीय आणि विशेष उल्लेखनीय नाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री संत ज्ञानेश्वर गुरुकुल विद्यामंदिर कानडी रोड केज ची या वर्षाची शैक्षणिक सहल नुकतीच अतिशय आनंददायी आणि अविस्मरणीय वातावरणात संपन्न झाली. हे विद्यालय विविध सृजनशील शालेय उपक्रम, प्रभावी कार्यक्रम आणि दर्जेदार पाठ्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कोमल बालमनावर उत्कृष्ट सुसंस्कार करणारे उत्तम आणि प्रेरणादायी केंद्र म्हणून ओळखले जाते.

सहल हा विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी एक मनोरंजक आणि ज्ञानात्मक विषय असतो, कारण त्यातून सर्वांना प्रत्यक्ष अनुभवातून अनेक महत्त्वपूर्ण गोष्टींचे शिक्षण मिळते.

दरवर्षी वेगवेगळ्या ऐतिहासिक आणि भौगोलिक भागात सहल घेऊन जाण्याचा मुख्य उद्देश हाच असतो की, मुलांना तेथील परिसराची तसेच अत्यंत प्राचीन आणि पवित्र धार्मिक स्थळांची सविस्तर आणि महत्त्वपूर्ण माहिती मिळावी व त्यांच्या ज्ञानात मोलाची भर पडावी.

यावर्षीची बहुप्रतिक्षित शैक्षणिक सहल मागील दोन दिवसांपूर्वी अत्यंत शांत आणि रमणीय असलेल्या बीड शहराजवळील श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे नेण्यात आली.

मागील आठवड्यापासून सहलीच्या उत्साहपूर्ण वातावरणात रमलेल्या विद्यार्थ्यांनी नयनरम्य आणि विहंगम गोरक्षनाथ टेकडीचे मनमोहक दृश्य पाहून त्यांची मने खूपच प्रफुल्लित झाली.

दररोजच्या वातावरणातून वेगळे होऊन सहलीत जाताना व येताना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे गाण्यांच्या धमाकेदार भेंड्या, मनसोक्त गप्पागोष्टी व विविध प्रकारच्या लज्जतदार खाऊचा भरभरून आणि मुक्तपणे आनंद घेतला.

तेथील उद्यानात मुक्तपणे हुंदडण्याचा व व विविध प्रकारच्या खेळण्यावर खेळण्याचा मनस्वी आनंद घेतला.

संस्थांच्या पूज्य महाराजांनी विद्यार्थ्यांना गोरक्षनाथ टेकडीच्या पवित्र आणि गौरवशाली परंपरेविषयी, तसेच नाथ संप्रदायाच्या प्राचीन इतिहासा विषयी अत्यंत विस्तृत आणि माहितीपूर्ण मार्गदर्शन केले.

संस्थेचे आदरणीय संस्थापक श्री दादासाहेब कराड, कार्यक्षम मुख्याध्यापिका सौ आरती ताई कराड आणि सर्व समर्पित शिक्षक, शिक्षकांनी सहलीचे अत्यंत उत्कृष्ट आणि उत्तम नियोजन केल्यामुळे ही महत्त्वाची शैक्षणिक सहल परम आनंदात आणि अपूर्व उत्साहात यशस्वीपणे संपन्न झाली.

# अंबाजोगाई नगरपरिषद निवडणूक : ७०.३५ टक्के मतदानाची नोंद, मोदी - मुंदडा आमने - सामने

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३ डिसेंबर**



मतदारांचा उत्साह, पोलिसांचा तगडा बंदोबस्त, २१ डिसेंबरपर्यंत उमेदवारांची धाकधूक वाढली.अंबाजोगाई नगरपरिषद निवडणूकीत मंगळवारी ७०.३५ टक्के मतदानाची नोंद झाली आहे. सकाळपासूनचं मतदारांनी केंद्रांवर हजेरी लावल्याने शहरात निवडणूक वातावरण तापले होते. विशेष म्हणजे, दोन प्रमुख आघाड्यांमधील थरारक लढतीमुळे मतदारांच्या उत्साहात लक्षणीय वाढ दिसून आली. या निवडणूकीत लोकविकास महाआघाडीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजकिशोर मोदी आणि अंबाजोगाई शहर जनविकास परिवर्तन आघाडीचे उमेदवार नंदकिशोर मुंदडा यांच्यातचं थेट सामना रंगला. या दोन्ही उमेदवारांनी गेल्या अनेक दिवसांपासून प्रचारात जोरदार आघाडी घेतल्याने शहरात वातावरण तापले होते. प्रत्येक प्रभागात मतदारांना पटवण्याची शर्यत सुरु होती. त्याचा परिणाम मतदान केंद्रांवरही दिसून आला.तुरळक किरकोळ घटना वगळता संपूर्ण शहरात मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता. शहरातील सर्व मतदान केंद्रांवर सुरक्षा व्यवस्था कडक ठेवण्यात आली होती. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदारांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. दुपारी काही केंद्रांवर रांगा वाढल्या असल्या तरी मतदान सुरळीत झाले. शहरातील तरुण मतदारांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनीच उत्साहाने मतदानाचा हक्क बजावला.आता सर्वांच्या नजरा २१ डिसेंबर रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे लागल्या आहेत. कोणाचे भविष्य मतपेटीत बंद झाले आहे ? कोण नगराध्यक्षपदाची गादी मिळवेल ? हे पाहण्यासाठी राजकीय वर्तुळात चांगलीच उत्सुकता निर्माण झाली आहे. उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांच्या चेहऱ्यावर मात्र निकालापर्यंतची धाकधूक कायम आहे. अंबाजोगाईतील ही निवडणूक शहराच्या पुढील पाच वर्षांसाठी दिशादर्शक ठरणार असल्याने निकालाकडे सर्वांचेच डोळे लागले आहेत.

## गुणवत्तेचा आलेख उंचावण्यात प्रा. अजय पाठक यांचे मोठे योगदान-चंद्रशेखर बर्दापूरकर

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३ डिसेंबर**



शैक्षणिक गुणवत्ता वाढीचा आलेख उंचावण्यात उपप्राचार्य अजय पाठक यांचे मोठे योगदान आहे.असे प्रतिपादन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी केले.

येथील योगेश्वरी महाविद्यालयाचे उपप्राचार्य अजय पाठक हे शनिवारी ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत झाले. त्यांच्या सेवानिवृत्ती प्रित्यर्थ महाविद्यालयाच्या वतीने निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर,संस्थेचे सहसचिव ओमप्रकाश शेटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मारुती कानेटकर, उपप्राचार्य डॉ .आर.व्ही.कुलकर्णी, प्रा. नीलिमा कुमठेकर,सत्कारमूर्ती प्रा .अजय पाठक, सौ .रोहिणी पाठक,डॉ. मैत्रेयी पाठक,अमेय पाठक ,धनराज सोळंकी, कमलेश कुमार ठाकूर,यांची उपस्थिती होती.

या वेळी बोलताना चंद्रशेखर बर्दापूरकर म्हणाले की उपप्राचार्य अजय पाठक यांचे व्यक्तिमत्व प्रभाव टाकून जाते.विद्यार्थ्याच्या उज्वल भविष्यात त्यांचे मोठे योगदान आहे. गुणवत्तेचा आलेख उंचावण्यासाठी त्यांनी काम केले. ते संस्थेशी कायम जोडलेले राहतील.त्यांच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा मिळाली. अशा शब्दात त्यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला.

यावेळी बोलताना ओमप्रकाश शेटे म्हणाले परिस्थिती कशी हाताळायची याचे उत्तम उदाहरण म्हणजे अजय पाठक होय. निष्ठा,समर्पण भावनेतून त्यांनी सेवा केली. एक विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून त्यांची ओळख आहे.या वेळी आपल्या सत्काराला उत्तर देताना अजय पाठक यांनी आपल्या ३५ वर्षांच्या सेवेतील चढ उतार सांगितले. आपली जडण घडण संस्थेच्या माध्यमातून झाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांच्या मनोगतामध्ये त्यांनी , स्वप्ने उराशी बाळगत विदर्भातून आलेल्या एक तरुणास स्वामी रामानंद तीर्थ यांच्या संस्थेमध्ये प्राध्यापकाची नोकरी करताना संपूर्ण आयुष्याची आणि कुटुंबाची जडण घडणं झाल्याचे सार्थक झाले! यावेळी रोहिणी पाठक यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी महाविद्यालयाच्या वतीने अजय पाठक,रोहिणी पाठक यांचा शाल श्रीफळ व भेट देऊन सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. निलिमा कुमठेकर यांनी केले. संचलन वृंदा कुलकर्णी यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. धनराज डोंगरदिवे यांनी मानले.

## राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त ग्राहकाची प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढावीत-अनिल बोर्डे

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३ डिसेंबर**



राष्ट्रीय ग्राहक दिन २४ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात व तहसील कार्यालयात साजरा केला जातो. राष्ट्रीय ग्राहक दिना पर्यंत बीड जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करण्यात यावी अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी मा. जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्ष निवेदन देऊन यासंबंधी चर्चा केलेली आहे.

जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या माध्यमातून ग्राहकाच्या विविध खात्याच्या समस्या निराकरण करण्याचे काम तात्काळ केले जात होते. ग्राहक पंचायत महाराष्ट्र या संघटनेच्या माध्यमातून वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला आहे परंतु त्याची दखल जिल्हाधिकारी कार्यालयाने अद्याप पर्यंत घेण्यात आलेली नाही. अद्याप पर्यंत ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना झालेली नाही. त्यामुळे ग्राहकाची कामे प्रलंबित राहत आहेत व त्यांना जलद गतीने न्याय मिळत नाही असे निदर्शनास आले आहे.ग्राहक पंचायत चे कार्यकर्ते अनेक वर्षापासून ग्राहक पंचायत कार्यकर्ते प्रबोधन व उदबोदन या क्षेत्रात कार्यरत आहेत. तरी निवेदनावर तात्काळ कार्यवाही करून ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करण्याची मागणी केली आहे. सदरील प्रकरणाचा तात्काळ निपटारा करावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. राष्ट्रीय ग्राहक दिना अगोदर ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करण्यात यावी. यावर तात्काळ विचारविनिमय होणे अत्यंत गरजेचे आहे.

तसेच राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त पर्यंत शेतकरी ग्राहकाची शेत रस्त्याची व इतर प्रलंबित फेरफार आदीची प्रकरणे प्रलंबित असल्याचे समजते त्यावर जलद गतीने निपटारा करणे आवश्यक आहे.केंद्र शासनाच्या ग्री ट्रॅक योजनेअंतर्गत प्रत्येक शेतकऱ्यांचा युनिक फार्मर आयडी( ओळखपत्र) असणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्याशिवाय संबंधित शेतकऱ्यांना कोणतेही अनुदान मिळणार नाही. त्यासाठी ग्रामपंचायत व पोलीस पाटील व तलाठी कार्यालया मार्फत मोठ्या प्रमाणात जनजागृती करणे आवश्यक आहे. व्यापक ग्राहक जागृती शिवाय पर्याय नाही. तसेच जिल्ह्यातील शासकीय व निम शासकीय कार्यालयामध्ये कर्मचारी वर्ग व अधिकारी ओळखपत्राचा वापर करीत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे .ओळखपत्र वापर न करणाऱ्या कर्मचाऱ्यावर तात्काळ शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. ग्राहक हिताच्या दृष्टीने राष्ट्रीय ग्राहक दिना अगोदर सदरील काम पूर्ण करणे आवश्यक आहे .अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे व गेवराई तालुका अध्यक्ष प्रा. भानुदास फलके व वडवणी तालुका अध्यक्ष शंकर झाडे आदींनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

# भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या हस्ते आष्टीत वकील दिना निमित्त वकीलांचा सत्कार

### आष्टी वकील संघाच्या अडचणी शासन दरबारी मांडु -शंकर देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**आष्टी दि.३ डिसेंबर**

जागतीक वकील दिना निमित्त भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष श्री शंकर देशमुख यांच्या वतीने आष्टी न्यायालयातील वकील बंधू भगिनींचा शाल पुष्प देऊन सन्मान करण्यात आला



भारतात दरवर्षी ३ डिसेंबर रोजी वकील दिन साजरा केला जातो. हा दिवस भारताचे पहिले राष्ट्रपती आणि विधिज्ञ असलेल्या डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या जयंतीनिमित्त साजरा होतो. या दिवशी वकील समुदायाच्या योगदानाचा, सामाजिक न्यायाला प्रोत्साहन देण्याच्या त्यांच्या भूमिकेचा आणि कायद्याच्या राज्याला टिकवून ठेवण्याच्या त्यांच्या कार्याचा सन्मान केला जातो वकील समाजाला न्याय मिळवून देण्यात, लोकशाही आणि मानवाधिकारांचे संरक्षण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. या दिवशी त्यांच्या या भूमिकेवर प्रकाश टाकला जातो आणि म्हणूनच भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष श्री शंकर देशमुख यांनी आष्टी येथील न्यायालयात आष्टी वकील संघाच्या कार्यालयात सर्व वकील बंधू भगिनींचा सत्कार केला या प्रसंगी भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड श्री वाल्मिक निकाळजे यांनी आपली भूमिका मांडली आष्टी वकील संघाचे अध्यक्ष ॲड ताहेर साहेब यांनी या सन्मानासाठी शंकर देशमुख यांचे आभार व्यक्त केले व वकीलांच्या अडीअडचणी मांडल्या

यावेळी आष्टी वकिल संघाचे अध्यक्ष ड ताहेर साहेब प्रदेश अनुसुचित मोर्चाचे उपाध्यक्ष ॲड वाल्मिक तात्या निकाळजे,ड बाबुराव अनारसे ॲड अजय जोशी ड तांदळे ॲड सायंबर ॲड झांबरे ॲड म्हस्के ॲड निकाळजे वैद्यनाथ ड शार्दुल जोशी ॲड सय्यद बँक सल्लागार राजेंद्र शिंदे रघुनाथ शिंदे महेश पवळ नितिन गायकवाड अशोक खंदारे संदीप नागरगोजे आदी वकील व कार्यकर्ते

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोली नगर पालिका निवडणुकीत ६६.२७ टक्के मतदान

## निकालाची प्रतिक्षा, निवडणुकीचा निकाल २१ डिसेंबरला लागणार





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ डिसेंबर**

हिंगोली नगर पालिका अंतर्गत नगराध्यक्षपद व नगरसेवकांच्या पदासाठी दि २ डिसेंबरला मतदान पार पडले. शहरात ६६.२७ टक्के मतदान झाले असून एकूण ४७ हजार ६३४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. नागपूर खंडपीठाच्या आदेशानुसार आता निवडणुकीचा निकाल दि २१ डिसेंबर रोजी लागणार आहे.

मंगळवारी हिंगोली व कळमनुरी या दोन शहरातील नगर पालिका निवडणुकीचे मतदान पार पडले. हिंगोलीतील प्रभाग क्रमांक ५ ब व ११ ब या दोन ठिकाणी मतदान २० डिसेंबरला होणार आहे. मंगळवारी शहरातील ७८ मतदान केंद्रांवर मतदान पार पडले. सकाळपासूनच मतदान केंद्रांवर मतदानासाठी नागरिकांनी रांगा लावल्या होत्या. यामध्ये महिला मतदारांनी सक्रीय सहभाग घेतल्याचे दिसून आले. मतदान केंद्रांना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी भेटी देत पाहणी केली.

सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदानाची वेळ होती. शहरातील ७१ हजार ८८० मतदारांपैकी ४७ हजार ६३४ मतदारांनी मतदान केले आहे. यामध्ये २५ हजार ०१८ पुरूष तर २२ हजार ६१६ स्त्री मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे अशी माहीती उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी दिली आहे.

शहरातील माणिक स्मारक, गणेशवाडी या ठिकाणी काहीवेळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती परंतु पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी घटनास्थळी भेट देत तत्काळ परिस्थिती नियंत्रणात आणली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संवेदनशील ठिकाणी चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. कडाक्याच्या थंडीतही मतदारांनी मतदानाचा हक्क बजावतांना वृध्द, दिव्यांग तसेच तरूण, तरूणी दिसत होते.

दरम्यान नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार आता हिंगोली व कळमनुरी नगर पालिकेचा निकाल दि २१ डिसेंबर रोजी लागणार असून निकालाची खमंग चर्चा बुधवारी नागरिक करीत असतांना दिसत होते. राजकीय पुढारी विजय आमचाच होणार असल्याचा दावाही करीत आहेत.

# निवडणुकीसाठी बनावट आधारकार्ड बनवीत असल्याची तक्रार

## पेरजाबाद येथील ग्रामस्थांचे निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ डिसेंबर**

औंढा तालुक्यातील पेरजाबाद गावात बनावट कागदपत्रे आणि आधार कार्ड बनवून मतदार यादीमध्ये नावे समाविष्ट करण्याचा प्रयत्न होत असल्याबद्दलची तक्रार तहसीलदार हरीश गाडे यांच्याकडे मंगळवारी दोन डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता निवेदनाद्वारे पेरजाबाद येथील ग्रामस्थांनी केली आहे.

येणाऱ्या काही काळात ग्रामपंचायतीच्या निवडणुका होणार असून त्यामध्ये पेरजाबाद हे गाव अनुसूचित जमातीसाठी राखीव झाले आहे. परंतु गावांमध्ये अनुसूचित जमातीचे लोक राहत नाहीत. जवळा बाजार येथील विजय प्रकाश पवार हे गावातील काही लोकांना हाताशी धरून ते मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी बीएलओकडे बनावट कागदपत्रे बनवून सादर करीत आहेत.बनावट कागदपत्राची योग्य तपासणी करून विजय प्रकाश पवार यांचे नाव मतदान यादीमध्ये समाविष्ट करू नये व बनावट कागदपत्रे तयार केले म्हणून योग्य ती कारवाई आणि चौकशी करण्याची मागणी पेरजाबाद येथील हरिश्चंद्र आव्हाड, पंढरीनाथ वाघ ,कन्हैया आव्हाड ,गंगाधर जाधव श्रीरंग आव्हाड, कुंडलिक मात्रे, पिराजी जाधव, संदीप वाघ दत्तराव जाधव, हनुमान जाधव, बबन सांगळे, गोपाल वाघ, एकनाथ आव्हाड, ज्ञानेश्वर जाधव, राहुल जाधव, मारुती आव्हाड, माणिक वरकड, जगन्नाथ मात्रे, बालासाहेब जुमडे, रितेश वाघ, भागवत मात्रे, जगन्नाथ जाधव, नवनाथ जुमडे, दिपाजी मात्रे, परमेश्वर सांगळे, रमण सांगळे, चांदू मात्रे, राघोजी आव्हाड, साहेबराव जाधव, यांच्यासह पेरजाबाद येथील ४१ ग्रामस्थांनी केली आहे.

# शुक्रवारी शाळा बंद आंदोलन, जिल्हा कचेरीवर शिक्षकांचा मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ डिसेंबर**

राज्यातील सर्व शिक्षक संघटनांच्या समन्वयाने शाळा तसेच विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या विविध मागण्यांसाठी ५ डिसेंबर रोजी हिंगोली सह संपूर्ण राज्यात शाळा बंद आंदोलन करण्यात येणार असून प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा आयोजन केलेले आहे.

शिक्षकांना टीईटी परीक्षा देण्याचा घेतलेला निर्णय मागे घ्यावा,अन्यायकारक संचमान्यता,रद्द करून यासाठी विद्यार्थी पट संख्येची अट शिथिल करावी,अंशतः अनुदानित या सह सर्वच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांना जुनी पेन्शन लागू करावी,शिक्षकेतर कर्मचारी यांना आश्वाशीत प्रगती योजना लागू करावी,स्वयंम अर्थसहाय्यीत शाळांना मान्यता देणे बंद करून मराठी शाळा वाचवाव्यात, शिक्षण विभागातील सर्व शिक्षक शिक्षकेतर रिक्त पदे तात्काळ भरावीत, सरसकट पदवीधर वेतनश्रेणी, वस्तीशाळा शिक्षकांची मागील सेवा गृहीत धरून त्यांना कायम करावे यासह अन्य प्रमुख मागण्या आहेत. मात्र सध्या ज्वलंत असलेले दोन प्रश्न सर्वांसाठी महत्वाचे आहेत.

शिक्षक पात्रता चाचणी उत्तीर्ण होणे अनिवार्य करून शिक्षकांना अडचणीत आणले जात आहे. भविष्यात या सक्तीने नोकरीमुक्त केले जाईल, अन्यायकारक संचमान्यतेच्या आडून शाळा शिक्षक अतिरिक्त ठरवून त्यांना डिसेंबर अखेरपर्यंत इतर जिल्ह्यात समायोजित करण्याचा डाव आखला जात आहे. दुसरीकडे दहा ते वीस पटाच्या आतील शाळेवर खाजगी कंपनीमार्फत कंत्राटी शिक्षक भरण्याचे नियोजन सुरू आहे. त्यातून सुद्धा शेकडो शिक्षक अतिरिक्त ठरतील. या सर्वांचे समायोजन करण्यासाठी जागाच उपलब्ध नसतील तर शेवटी कंटाळून त्याने नोकरीचा राजीनामा द्यावा. परिणामतः भविष्यात सर्व मराठी शाळा बंद पडतील हा धोका आहे.सर्व शिक्षक व शिक्षकेतर संघटना या आंदोलनात सोबत येणार आहेत.

हिंगोली जिल्ह्यासह राज्यातील संपूर्ण शाळा ५ डिसेंबरला बंद केल्याशिवाय पर्याय नाही अशी माहिती आंदोलनाच्या शिक्षक समन्वय समितीने दिली आहे. या आंदोलनात मोठ्या संख्येने शिक्षक, शिक्षिका तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी होणार असल्याचा अंदाज व्यक्त केल्या जात आहे.



**हिंगोली– जिल्हा दिव्यांग पुर्नवसन केंद्रात जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. यावेळी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अधिकारी गीता गुठ्ठे, डॉ गोपाल कदम, डॉ मनीष बगडीया, डॉ सचिन बोधगिरे, किशन मुटकुळे आदींसह दिव्यांग बांधव उपस्थित होते. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### मिर्झा बेग यांना शंभर कवींनी वाहीली श्रध्दांजली

हिंगोली–.महाराष्ट्र राज्यअध्यक्षा सौ.सिंधूताई दहिफळे यांनी डॉ. मिर्झा एक्स्प्रेस अर्थातच प्रसिद्ध साहित्यिक डॉ. मिर्झा रफी बेग यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या कार्याला उजाळा देण्यासाठी आणि त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी भव्य ऑनलाईन कविसंमेलन आयोजित केले होते. महाराष्ट्रातून शंभर कवींना निमंत्रित केले होते. या कविसंमेनाला अध्यक्षा म्हणून पश्चिम विभाग प्रमुख तथा प्रसिद्ध साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या सौ.निशा विसपुते उपस्थित होत्या तर उद्घाटक म्हणून अक्षरोदय साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सदानंद सपकाळे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून रानकवी राजकुमार नायक, यमुनाई प्रकाशनचे भारतकुमार लाड, पत्रकार तथा प्रसिद्ध कवी विजय गुंडेकर, साहित्यिक सचिन पाटील रायगड, शिवदास कराड लातूर, उमाकांत काळे अकोला उपस्थित होते. या कविसंमेलनाची सुरुवात बेग मिर्झा यांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली. कविसंमेलनाचे सूत्रसंचलन अक्षरोदय साहित्य मंडळाच्या राज्य अध्यक्षा सौ. सिंधूताई दहिफळे यांनी केले, प्रास्ताविक चंद्रकांत चव्हाण यांनी केले तर आभार कोषाध्यक्षा उषाताई ठाकूर यांनी मानले.

### हिंगोलीत जागतिक दिव्यांग उत्साहात साजरा

हिंगोली– जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र हिंगोली येथे आज जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अधिकारी गीता गुट्टे,अस्तिरोग तज्ञ तथा नोडल ऑफिसर डॉ. मनीष बगडिया, डॉ.गोपाल कदम, डॉ. सचिन बोधगिरेशि, हिंगोली जिल्हा दिव्यांग समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष किशन मामा मुटकुळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. डी डी आर सी येथील सभागृहात आज दिव्यांग दिन याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अधिकारी गीता गुट्टे मॅडम यांनी उपस्थित दिव्यांग बंधू भगिनींना मार्गदर्शन केले. यावेळी दिव्यांग बंधू भगिनींना फराळाचे साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना गीता गुठ्ठे यांनी सांगितले की हिंगोली जिल्ह्यातील दिव्यांग बंधू भगिनींच्या सुविधासाठी समाज कल्याण विभागाच्या वतीने विविध योजना राबविण्यात येत असून संबंधित दिव्यांग बंधू भगिनींनी आपले कागदपत्र योग्य रीतीने समाज कल्याण विभागाकडे देण्यात यावे जेणेकरून त्यांना कोणत्याही योजनेपासून वंचित राहता राहणार नाही याची काळजी सुद्धा घ्यावी. तसेच जिल्हा परिषद येथील जी लिफ्ट बसवण्यात आलेली आहे ती सुद्धा लवकरात लवकर चालू करण्यात येईल आणि दिव्यांग बंधू भगिनींसाठी जिल्हा परिषद मध्ये स्वतंत्र स्वच्छता ग्रह सुद्धा निर्माण करण्यात येत असे यावेळी त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे आयोजन हिंगोली जिल्हा दिव्यांनी समन्वय समिती हिंगोली च्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हिरामण पोपटे, माणिक वाबळे राजकुमार वीरशैव, डि.डी.आर.सी.चे कर्मचारी सचिन इंगोले, मुंढे, साईनाथ राठोड, प्रदिप वानरे, रंगनाथ मुटकुळे, भारतभुषण रणवीर, संपत लोणकर, संतोष मुटकूळे सावित्रीबाई नेवाल, सदाशिव वाकळे, आदींनी परिश्रम घेतले.

# वसमत पंचायत समितीचे बांधकाम निकृष्ट?



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ३ डिसेंबर**

येथील पंचायत समितीच्या इमारतीचे सुरू असलेले बांधकाम पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. काँक्रीटमध्ये वाळूऐवजी फरशीखालील भराव म्हणून वापरला जाणारा डस्ट मिसळला जात असल्याचा धक्कादायक प्रकार प्रत्यक्ष पाहणीत उघड झाला आहे. एवढ्या मोठ्या शासकीय प्रकल्पात असा निर्ढावलेला निकृष्टपणा कसा चालतोय, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

शहरात चांगल्या प्रतीची वाळू सहज उपलब्ध असताना कंत्राटदार मात्र ‘बचत’च्या नादात डस्टच वापरत असल्याचे ठळकपणे दिसून येत आहे. तज्ञांच्या म्हणण्यानुसार, अशा मिश्रणातून तयार होणारे काँक्रीट टिकाऊ नसते, तडे जाण्याची शक्यता जास्त आणि संपूर्ण संरचनेलाच धोका निर्माण होतो.बांधकामस्थळी अधिकारीच नाहीत; यंत्रसामग्रीचा पत्ता नाही सर्वात गंभीर म्हणजे, बांधकामस्थळी एकही जबाबदार अधिकारी हजर नव्हता! काँक्रीटच्या कामात अनिवार्य असणारे व्हायब्रेटर, स्क्रीड व्हायब्रेटर यांसारखी उपकरणे तर दिसलीच नाहीत. पूर्ण काम मॅन्युअली रेटले जात असल्याची तक्रार मिळाली आहे.तज्ञांचे मत स्पष्ट यंत्रसामग्रीशिवाय आणि डस्ट मिसळून केलेले काम टिकण्याचा प्रश्नच नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची भूमिका अधिकच संशयास्पद ठरते. नियमाप्रमाणे कामाच्या दिवशीचे मोजमाप त्याच दिवशी, कामाच्या ठिकाणी नोंदवणे बंधनकारक आहे. कामावर अधिकारी दिसत नाहीत, बिलाच्या वेळी मात्र सोयीच्या ठिकाणी बसून मोजमाप पुस्तिका रात्री बे-रात्री भरतात. कनिष्ठ ते वरिष्ठ अभियंत्यांच्या स्वाक्षऱ्या अशाच प्रकारे ’चालत्या बिलावर’ घेतल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे संपूर्ण मोजमाप प्रक्रियेवर मोठा प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

कामाच्या गुणवत्ता चाचण्यांबाबतही गंभीर आरोप पुढे आले आहेत. नमुने सोयीप्रमाणे उचलणे, अहवाल सोयीप्रमाणे देणे, अशा पद्धतीने चाचण्या होत असल्याची चर्चाही नागरिकांत आहे. अशा प्रकारे डस्टचे मिश्रण, अनुपस्थित अधिकारी, यंत्रसामग्रीचा अभाव आणि मोजमापातील संशयास्पद पद्धती यामुळे वसमत पंचायत समिती इमारत भविष्यात धोक्यात येऊ शकते. दररोजच्या कामाच्या ठिकाणीच अभियंत्याने मोजमाप पुस्तिका भरावी, नियम कठोर करावेत, आणि निकृष्ट कामावर तात्काळ कारवाई करावी. अशी मागणीही होत आहे.

# औंढ्यात श्रीदत्त जयंतीनिमित्त भिक्षा फेरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ डिसेंबर**

औंढा नागनाथ येथे श्रीदत्त जयंतीनिमित्त सोमवारी भिक्षा फेरीचे आयोजन करण्यात आले होते. फेरी शहरातील विविध मार्गाने काढण्यात आली होती. यामध्ये मुख्यपुजारी पद्माक्ष पाठक, माजी नगरसेवक अनिल देव, निळकंठ देव, सुरेंद्र डफळ, तुळजादास भोपी, हरिहर भोपी, श्रीपाद भोपी, कृष्णा ऋषी बिंदू तपोवनकर, पुरुषोत्तम लांबडे, अच्युत पाठक, सचिन देव महेश जोशी विनायक देव, पप्पू देशपांडे, शशांक ऋषी, रवी पाठक, अभिजीत लोखंडे, दीपक पाठक, राजेश्वर देव, अथर्व देव सुबोध देशपांडे, लल्ला देव, कल्याण पुराणिक, संजय पाठक, डॉ. अभय देशपाडे, नारायण भोपी, अनिल पाठक, बिंदू तपोवनकर, लल्ला देव,सचिन देव, प्रभाकर जवळेकर, दत्ता ऋषी, डॉ. हरीश ऋषी, दिना पाठक, बिटु देव, सौरभ पुराणिक, कृष्णा देव, सुनील पुराणिक, निळू तपोवनकर यांच्यासह दत्त सेवा मंडळ पदाधिकारी उपस्थिती होती.

# पवार पब्लीक स्कूलमध्ये फॅन्सी ड्रेस स्पर्धा




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ डिसेंबर**

शहरातील अंबिका नगर येथील अग्रगण्य असलेल्या पवार पब्लिक स्कुल मध्ये शनिवारी फॅन्सी ड्रेस स्पर्धेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या पोशाखात अभिनयही सादर केला.

या शाळेत दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विविध उपक्रम राबविले जात आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच कला गुणांना वाव मिळावा यासाठी संस्काराचे धडे दिले जातात. याशिवाय गणपती तयार करणे, जनरल नॉलेज, यासह विविध उपक्रम राबविले जातात त्यानुसार शनिवारी २९ नोव्हेंबर रोजी फॅन्सी ड्रेस स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमाचा शुभारंभ शाळेचे संचालक प्रणव पवार यांच्या हस्ते करण्यात आले. हा कार्यक्रम तीन वर्ग स्तरावर घेण्यात आला. यामध्ये वर्ग नर्सरी ते पहिलीतील मुलांनी फळे व स्वातंत्र्यवीरांच्या वेशभूशेत येऊन त्याबद्दल माहिती दिली. तर २ री ते ५ वी मधील मुलांनी भारतातील काही राज्यातील पारंपरिक वेशभूषेत येऊन कृतीद्वारे माहिती दिली. तसेच पाचवी मधील एका विद्यार्थिनीने भूलभुलैया पिक्चर मधील मंजुलिका बनून सर्वांचे लक्ष वेधले. तर इयत्ता सहावी ते नववी मधील मुलांकडून रॅम्प वॉक आणि विविध कलाकृती करून घेण्यात आल्या सहावी मधील एका विद्यार्थ्याने पीएसएलव्ही रॉकेट बनून त्याबद्दल माहिती दिली. यावेळी शाळेचे संचालक प्रणव पवार, कोमल अग्रवाल, सॉली के सी, दीपाली राऊत, अपर्णा जामकर, दिपाली मुदिराज, ठाकरे, धनवे, फिजा सय्यद, सचिन धामणे, पंकज इंगोले, सचिन इंगोले, योगेश थोरात, गजानन वानरे, जॉबीन, पाईकराव, वैभव काळे, विकास महानोर आदींची उपस्थिती होती.

# मतदान यंत्रावरील मशाल चिन्ह अंधुक व अस्पष्ट

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ डिसेंबर**

नगर पालिका निवडणुकीकरिता मतदान प्रक्रिया सुरू असतांना मतदान यंत्रावर उध्वद बाळासाहेब ठाकरे सेनेचे उमेदवार यांचे निवडणुक चिन्ह असलेली मशाल अंधुक आणि अस्पष्ट असल्याची तक्रान नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अर्चना भिसे तसेच सहसंपर्क प्रमुख विनायक भिसे यांनी निवडणुक निर्णय अधिकारी यांचेकडे केली आहे.

हिंगोली नगर पालिका निवडणुकीत दि २ डिसेंबर रोजी मतदान पार पडले. या निवडणुकी उबाठा शिवसेनेच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अर्चना श्रीराम भिसे यांनी मशाल या चिन्हावर निवडणुक लढविली आहे. यासाठी प्रचार काळात त्यांनी घरोघरी जाऊन मशाल या चिन्हाला मतदान करण्याचे आवाहन केले. परंतु मतदान यंत्रावर मात्र आपले चिन्ह असलेली मशाल हे चिन्ह खुपच छोट्या आकारात असल्याचे तसेच अंधुक आणि अस्पष्ट असल्याची तक्रार मतदारांच्या सांगण्यावरून केली. उमेदवार उमेदवार अर्चना भिसे यांनी याबाबत निवडणुक निर्णय अधिकारी समाधान घुटुकडे यांच्याकडे आक्षेप घेत संबंधितावर तातडीने कार्यवाही करावी अशी मागणी केली. शिवाय हा प्रकार म्हणजे आमच्यावर झालेला एकप्रकारे अन्यायच आहे असा आरोपही त्यांनी माध्यमांशी बोलतांना केला आहे. याबाबत सहसंपर्क प्रमुख विनायक भिसे यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले की, मतदान यंत्रावर मशाल हे आमचे चिन्ह अस्पष्ट व अंधुक आहे. त्यामुळे निवडणुक विभागाने याची गंभीर दखल घ्यावी असे आवाहन केले.

# अवैध वाळू उत्खननाविरोधात मोठी कारवाई

## ४९ लाखांचा मुद्देमाल नष्ट, २० लाखांचे इंजिन जप्त

**भा वृतसेवा**
**ांदेड, दि. ३ डिसेंबर-**

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या ार्गदर्शनाखाली व उपविभागीय अधिकारी ॉ. सचिन खल्लाळ तसेच तहसीलदार ंजय वारकड यांच्या निर्देशानुसार नांदेड हसील प्रशासनाच्या पथकाने आज ३ डेसेंबर रोजी पहाटे मोठी कारवाई केली. कूण ४९ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल ष्ट तर २० लाख रुपये किंमतीची ५ इंजिन ़प्त करून लिंबगाव पोलीस स्टेशनमध्ये ़मा करण्यात आली.



नायब तहसीलदार स्वप्निल देगलवार, मंडळ अधिकारी कुणाल ़गताप, मोहसीन सय्यद, ग्राम महसूल अधिकारी माधव भिसे, संजय खेडकर, हेश जोशी, मनोज जाधव, तलाठी मारोती श्रीरामे, मनोज सरपे, महसूल सेवक बालाजी सोनटक्के, शिवा तेलंगे यांच्या पथकाने पहाटे ५ वाजता विष्णुपुरी, कल्लाळ परिसरात गस्त घालत असताना अवैध वाळू उत्खनन करणारे इंजिन व बोटी नदीमार्गे पळून गेल्याचे निदर्शनास आले.

पथकाने तात्काळ पाठलाग करून बोरगाव तेलंग परिसरात गोदावरी नदीमध्ये ३ बोटी आणि ५ इंजिन जप्त करण्यात यश मिळविले. मजुरांच्या साहाय्याने ३ बोटी स्फोट करून नष्ट करण्यात आल्या तसेच २५ तराफे जागेवरच जाळून नष्ट करण्यात आले. ५ इंजिन जप्त करून लिंबगाव पोलीस स्टेशनमध्ये जमा करण्यात आली.

कारवाईदरम्यान पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली लिंबगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बोधनकर, पोलीस उपनिरीक्षक सय्यद तसेच पोलीस कर्मचारी रमण बैनवाड, मोरे, गर्दनमारे, तेलंग, पो. का. देशमुख आदींचे पथक उपस्थित होते.

अवैध वाळू उत्खननाविरोधात कठोर व सततची कारवाई सुरूच राहील असा स्पष्ट इशारा नांदेडचे उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ व तहसीलदार संजय वारकड यांनी दिला आहे.

# बिलोली न.प.साठी ७५.९१ टक्के मतदान

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ३ डिसेंबर-**

बिलोली जवकास गेल्या पंहारा दिक्सापासून चालु असलेल्या बिलोली नगरपालीका निवडणुकीच्या प्रक्रियेतील मतदानाचा टप्पा आला पूर्ण झालेला आहे. झालेल्या मतदानापैकी एकुण ७५.९१ टक्के मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला असून यामध्ये पुरुषांची मतदार संख्या ४८५२ तर स्त्रियांची मतदार संख्या ४६७८ आहे. सदर निवडणुकीत सहायक निवडणुक अधिकारी बी. जी. मिठ्ठेवाड यांनी महत्वपूर्ण सेवा बजावून प्रक्रिया पार पाडली.

या ठिकाणी २० नगरसेवक व नगराध्यक्ष पदासाठीची निवडणूक होती. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या दिवसापासून अनेक घडामोडीमुळे लक्ष लागून राहिलेल्या बिलोली नगरपरिषद निवडणूकीत काँग्रेस, राष्ट्रवादी अजित पवार आ मराठवाडा जनहित पार्टी यांनी नगराध्यक्ष पदासह नगरसेवक पदाच्या सर्व २० जागांवर आपले उमेदवार उभे केले आहेत तर शिंदेच्या शिवसेनेने नगराध्यक्षपदासह चार नगरसेवक पदावर उभे करून आपले नशीच अजमावत आहेत. गेल्या काही दिवसांपासून वेगवेगळ्या पद्धतीने प्रचार राबवून आपल्याला मत कसे मिळेल यासाठी सर्वध उमेदवारांनी रााांदिवस मेहनत होती. अखेर नगराध्यक्ष व नगरसेवकपदासाठी २ डिसेंबन रोजी प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया पार पहली १० प्रभागातील २० मतदान केंद्र उभारण्यात आले होते. या २० केंद्रावर शहरातील एकूण १२ हजार ६०२ मतदारांपैकी ५६७ एवढया मतदारांनी मतदानाचा हक्क बजावून लोकशाहीच्या या उत्सवात सहभाग घेतला आहे. दुसरीकडे उमेदवारी मागे घेण्यालय कारणावरून झालेल्या राड्यामुळे सतर्क झालेल्या पोलिस प्रशासनाने मतदानाच्या पुर्वसंध्येपासूनच शहरातील सर्व मतदान केंद्रांसह कडेकोट बंदोबस्त ठेवाला होता. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी बिलोली पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अतुल भोसले यांनी चोख पोलिस बंदोबस्त ठेवला होता. एकंदरीत बिलोली नगर परिषदेसाठी कालची मतदान प्रक्रिया अगदी सुरळीतपणे पार पडली असली तरी, पुढचे काही दिवस उमेदवारांना झोप येईल असे वाटत नाही कारण, काल झालेल्या मतदानाची १९ दिवसानंतर २१ डिसेबर रोजी मतमोजणी होणार आहे. मतमोजणीना लाडक्या बहिणीनी आपली मते कोणाच्या झोळीत टाकले हे उघड होणार आहे. असे असले तरी कुणाला सहानुभुती मिळणार, कुणाचे डोके ठिकाण्यावर येणार याकडे मात्र अख्मा शहर वासियांचे लक्ष लागून आहे.

### नायगाव तालुक्यात अवैध दारुविक्री बेलगाम; नागरीकांत तीव्र संताप

**नरसी** - नायगाव तालुक्यात अवैध दारूविक्री शिगेला पोहोचली असून नियंत्रणाची जबाबदारी असलेला उत्पादन शुल्क विभागाचीच मुक संमती असल्याचे धक्कादायक चित्र उघड झाले आहे. गावोगावी किराणा दुकान, पानटपऱ्या, हॉटेलं, तसेच काही घरांतही देशीविदेशी दारू सहज उपलब्ध होत असल्याने तरुणांमध्ये व्यसनाधीनतेचे मोठे प्रमाण वाढत आहे. या अवैध दारू विक्रेत्यांकडून दरमहा ठरल्या प्रमाणे वसूली करणा-या कर्मचाऱ्यांना संबंधित उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांची मुक संमती आहे का? असे पालक व महिलावर्गातून तीव्र संताप व्यक्त होत असून ''विभाग नेमका कोणाला संरक्षण देतो?'' असा खडा सवाल उपस्थित केला जात आहे. तालुक्यातील परिस्थिती बेकाबू होण्यामागे उत्पादन शुल्क विभागातील काही कर्मचाऱ्यांचा थेट हात असल्याच्या उघड चर्चा सुरू आहेत. दरमहा 'ठरल्याप्रमाणे' वसुली करून उच्चपदस्थांपर्यंत पैसा पोहोचवला जातो, त्यामुळे अवैध धंद्याविरुद्ध कोणतीही ठोस कारवाई करण्यात येत नाही, असा नागरिकांचा आरोप आहे. काही ठिकाणी दारूविक्री थेट अधिकाऱ्यांच्या माहितीमध्ये असूनही कारवाई होताना दिसत नाही, हे अधिकच संशयास्पद असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.




### धनमुद्रा अर्बन मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचा निवडणूक जाहीर

**नांदेड** -धनमुद्रा अर्बन मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड चा पंचवार्षिक निवडणूक जाहीर करण्यात आल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली आहे. या निवडणूक कार्यक्रमासह दिनांक ८ डिसेंबर रोजी संस्थेच्या पात्र मतदारांची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. दिनांक ९ ते दिनांक १३ डिसेंबर या कालावधीत प्रारूप मतदार यादी आक्षेप नोंदवणे. प्राप्त झालेले आक्षेपाची छाननी ही दिनांक १५ डिसेंबर ते १९ डिसेंबर या कालावधीत करण्यात येऊन दिनांक २० डिसेंबर रोजी संस्थेच्या सभासदांची अंतिम मतदार यादी सकाळी ११ वाजता प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर दिनांक २२ डिसेंबर ते २७ डिसेंबर या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत नामनिर्देशन पत्र दाखल करणारे करता येतील . प्राप्त नामनिर्देशन पत्रांची प्रसिद्धी दिनांक २७ डिसेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता करण्यात येणार आहे. नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक २९ डिसेंबर रोजी करून वैद्य नामनिर्देशन पत्राची प्रसिद्धी दिनांक २९ डिसेंबर रोजी सायंकाळी करण्यात येणार आहे. दिनांक ३० डिसेंबर रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत नामनिर्देशन पत्र परत घेता येतील . त्यानंतर निवडून द्यावयाच्या उमेदवारांची अंतिम यादी ३० डिसेंबर रोजी दुपारी पाच वाजता प्रसिद्ध करण्यात येईल आणि आवश्यकता असल्यास दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या कालावधीत मतदान घेण्यात येणार असून दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी करण्यात येईल .त्यानंतर निकाल देण्यात येईल अशी माहिती ही निवडणूक निर्वाचन अधिकाऱ्याने दिली आहे.

### स्वामी विवेकानंद महाविद्यालयात क्रीडा महोत्सव ज्योत मशाल रॅलीचे आगमन



**मुक्रमाबाद** -स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आयोजित २०२५, सत्तावीस वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव चार ते आठ डिसेंबर २०२५ या कालावधीत संपन्न होत आहे. त्यानिमित्त विद्यार्थी जनजागृती करण्यासाठी विद्यापीठाकडून क्रीडा ज्योत मशाल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. आज दिनांक ०३ डिसेंबर २०२५ रोज बुधवार दुपारी ठीक १२:०५ वाजता स्वामी विवेकानंद महाविद्यालयाच्या प्रांगणात या रॅलीचे आगमन झाले. या रॅलीचे आगमन होताच महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ मा.म. गायकवाड आणि महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारीवर्ग यांनी या रॅलीचे व विद्यापिठाकडून आलेल्या सर्वाचे स्वागत केले. क्रीडा ज्योत रॅलीचे समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ मारुती गायकवाड यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची (नशामुक्तीची) शपथ देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना डॉ मारुती गायकवाड यांनी क्रीडा ज्योत रॅलीच्या आयोजनामागील हेतू सांगितला. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये खेळाविषयी जागृती व्हावी या उद्देशाने या रॅलीचे आयोजन केले असल्याचे त्यांनी सांगितले. सोबतच लातूर जिल्ह्याचे समन्वयक प्राध्यापक डॉ होकर्णे सर यांची उपस्थिती होती. महाविद्यालयातील संपूर्ण प्राध्यापक या रॅलीच्या स्वागतासाठी उपस्थित होते. सुरुवातीला डॉ एकनाथ भिंगोले यांनी मशाल हाती घेऊन महाविद्यालयाच्या मंचापर्यंत रॅलीला घेऊन गेले. त्यानंतर सर्व विद्यार्थी आणि स्टॉप ने रॅलीत सहभागी होऊन महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराच्या बाहेर रॅलीला पाठवण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ आर. बी. मादळे यांनी केले तर आभार संस्कृतीक विभागप्रमुख डॉ आर. बी. बाविस्कर यांनी मानले.

# विद्यापीठामध्ये राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवात २४ विद्यापीठातील ३ हजार खेळाडूंचा सहभाग

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ३ डिसेंबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे मा. राज्यपाल यांच्या कार्यालयामार्फत पुरस्कृत २७ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव २०२५ यावर्षी दि. ४ ते ८ डिसेंबर २०२५ या कालावधीत उत्साहात आयोजित करण्यात आला आहे. राज्यातील विविध विद्यापीठांच्या क्रीडापटूंना एकत्र आणणारा हा भव्य सोहळा विद्यापीठाच्या क्रीडा मैदानावर रंगणार आसुन येथील क्रीडा विभागाकडून करावयाची मैदानावरील कामे अजूनही चालू असल्याचे चित्र दिसून येते सदरील कामे वेळेवर न पूर्ण होण्याचे कारण म्हणजे टेंडरिंग वेळेवर न सुटल्याने झाले असल्याचे संबंधितांकडून कळाले सदरील कामे वेळेत होण्यासाठी विद्यापीठाचे कुलगुरू यांनी लक्ष लक्ष देण्याची गरज आहे.

या क्रीडा महोत्सवात बॅडमिंटन, टेबल टेनिस, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, खो-खो, कब्बडी, बुद्धिबळ आणि थलेटिक्स (रनिंग,




उंच उडी, लांब उडी इत्यादी) या आठ क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. राज्यातील २४ विद्यापीठातील १७२१ मुले आणि १५८६ मुली असे एकूण ३३०७ खेळाडू सहभागी होणार आहेत. खेळाडूसह मार्गदर्शक आणि व्यवस्थापकांची संख्या ५७६ असणार आहे. तसेच या स्पर्धे करिता २७६ पंचांची नियुक्ती विद्यापीठातर्फे करण्यात आलेली आहे.

विशेष म्हणजे यावर्षी राज्यपाल यांच्या सुचनेनुसार विद्यापीठाने पहिल्यांदाच 'भारत पोर्टल' नावाने लिंक तयार केलेली आहे. या लिंकद्वारे यावर्षी स्पर्धा भारतभर बघता येणार आहेत. असा प्रयोग करणारे 'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड' हे महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ आहे. आणि हा विद्यापीठासाठी एक बहुमान आहे. क्रीडा महोत्सवाची जय्यत तयारी विद्यापीठ परीसरामध्ये सुरु आहे. याकरिता विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर आणि प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन, तांत्रिक, पात्रता, निवास, वैद्यकीय, अहवाल लेखन, निधी संकलन, खरेदी व वित्त, सांस्कृतिक, क्रीडा ज्योत, बक्षीस वितरण, पाणी वाटप, विद्युत व्यवस्था, प्रोटोकॉल व फ्लॅग, तक्रार निवारण, वाहतूक, भोजन प्रसिद्धी व वृत्तांकन, स्वच्छता, क्रीडा साहित्य वाटप, कार्यालयीन कामकाज आदी २८ समित्या स्थापन करण्यात आलेली आहेत. सर्व समित्यांमध्ये विद्यापीठ परिक्षेत्रातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यापीठ परिसरातील प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी आदींचा समवेश आहे.

## मुदखेड नगर परिषद निवडणूक प्रक्रिया शांततेत

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ३ डिसेंबर-**

मुदखेड नगर परिषद निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण वातावरणात पार पडली असून काही बुथवर सायंकाळी ७:०० वाजेपर्यंत मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला आहे.




मुदखेड शहरातील एकूण मतदार संख्या २१ हजार ७४९ यामध्ये महिला ११,०१९ आणि १०,७२७ पुरुष तर इतर तीन. सार्वत्रीक नगर परिषद निवडणूक दि.२ डिसेंबर रोजी सकाळी ७:३० वाजता सुरु झाली. सकाळी मतदान केंद्र १ व २ मधील ईव्हीएम मशीनमध्ये काही तांत्रीक बिघाड झाल्यामुळे काही वेळ मतदान थांबले होते.

सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मारोती जगताप, विजयकुमार पाटे, यांना माहीती मिळताच ताबडतोब त्या केंद्रावर जाऊन ईव्हीएम मशीन दुरुस्त करून मतदान प्रक्रियेला सुरुवात केली. या केंद्रावर सायंकाळी ६:३० वार्जपर्यंत तर प्रभाग क्र.२ (ब) मध्ये मतदान प्रक्रिया संध्याकाळी ७:०० वाजेपर्यंत सुरु होती. निवडणूकीत पुरुष ८११९ आणि महिला ७८७८ तर इतर तीन असे एकूण १५,९९७ मतदारांनी मतदान करून आपल्या मतदानाचा हक्क बजावला असून ७३.५५% झाले आहे. मतदान केंद्र २५ मध्ये प्रभाग क्र. १० मध्ये सर्वात जास्त मतदान झाले आहे. तर सर्वात कमी मतदान प्रभाग क्र.३ मध्ये झाले आहे. मुदखेडच्या मतदारानी ७३.५५% करून १० नगराध्यक्षाचे तर ८८ नगरसेवक पदाच्या उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएम मशीनमध्ये बंद केले आहे. आता मतमोजणी दि.२१ डिसेंबर रोजी होणार असून कोण विजयी होणार हे त्याच दिवशी कळणार आहे. या मतदान प्रक्रियेचे नियोजन निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार आनंद देऊळगावकर, सहाय्यक निवडणूक अधिकारी मारोती जगताप, सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी जगदिश दळवी, विनयकुमार पाटे,व त्यांचे सर्व सहकारी यांनी वरिष्ठ अधिकारी यांच्या आदेशानुसार नियोजन केले होते. आणि पुर्ण निवडणूक होई पर्यत पोलिस निरिक्षक धीरज चव्हाण यांनी चौख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## हदगाव नगर परिषदेसाठी ६५ टक्के मतदान

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ३ डिसेंबर-**

हदगाव नगर परिषदेच्या २०२५ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सगळ्याच पक्षांनी, अपक्षांनी कसून प्रचार यंत्रणा राबवीत हदगाव शहरात निवडणुकीत एक प्रकारे चांगलीच रंगत आणली होती त्यास मतदारांनी देखील प्रतिसाद देत एकूण ६५.८०% मतदान शांततामय वातावरणात पार पडले असून आता सगळ्यांच्या नजरा मतमोजणी होणाऱ्या दि.२१ डिसेंबर कडे लागलेल्या आहेत.

हदगाव नगरपरिषदेसाठी दि.२ डिसेंबर रोजी झालेल्या मतदानात मतदारांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. सायंकाळी उशिरापर्यंत मतदान सुरू होते मतदान केंद्रा भोवताली मतदारांचे रांगाच दिसून येत होते. एकूण ६५.८०% मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावाला असून १० प्रभागासाठी २० नगरसेवक तर १ नगराध्यक्ष निवडून देण्यासाठी मतदारांनी मतदान करून उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएम मशीन मध्ये बंद केले असून मतमोजणी दि.२१ डिसेंबर रोजी होणार असून मतदारांना २१ डिसेंबरची प्रतीक्षा करावी लागणार आहे. मतदारांमध्ये निकालाविषयी प्रचंड उत्सुकता वाढली असल्याचे दिसून येत आहे. शहरातील २३,१९४ मतदारांपैकी १५,२६१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला यात पुरुषांनी ७८९० तर स्त्रियांनी ७३७१ याप्रमाणे आपला मतदानाचा हक्क बजावला आहे.

## नायगाव तालुक्यातील थ्री फेज लाईट रात्री ऐवजी दिवसा करा:सुगावे

**तभा वृतसेवा**
**बरबडा, दि. ३ डिसेंबर-**

नांदेड -हैद्राबाद राज्यमार्गावरील नायगाव तालुक्यातील कृष्णुर पंचताराकींत औद्योगिक वसाहत परिसरात बिबट्या आढळून आला असून या बिबट्याने एका कामगारांवर जीवघेणा हल्ला केला असून यात कामगार जखमी झाल्यामुळे शेतकरी, व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे थ्री फेज लाईट संध्याकाळ ऐवजी दिवसा करावी अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. तरी संध्याकाळ ऐवजी थ्री फेज लाईट दिवसा करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस वसंत सुगावे पाटील यांनी महावितरण चे अधीक्षक अभियंता यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

सध्या कापुस वेचणी ,हरभरा खुरपणीचे तसेच रब्बी हंगाम चालू असल्यामुळे रब्बी पिकांना पाणी देण्याचे काम शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात चालू असून, पाणी देण्याचे काम थ्री फेज लाईट असली तरच देता येऊ शकते परंतु थ्री फेज लाईट सध्या संध्याकाळी चालू आहे.

## सैनिक स्कूल सोसायटी, रक्षा मंत्रालय व सगरोळीच्या सैनिकी विद्यालय यांच्यात महत्वपूर्ण करार

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ३ डिसेंबर-**

सैनिकस्कूल सोसायटी, संरक्षण मंत्रालय (भारत सरकार,नवी दिल्ली) व सगरोळी (ता.बिलोली) येथील राजर्षी श्री छत्रपती शाहू सैनिकी विद्यालय यांच्यात नवीन सैनिक स्कूल स्थापन करण्याबाबतचा नुकताच महत्वपूर्ण करार झाला असून, पुढील शैक्षणिक वर्षापासून मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय दर्जाचे सैनिकी शिक्षण सगरोळी येथे उपलब्ध होणार आहे. या केंद्रीय सैनिक स्कूलमध्ये येणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून इंग्रजी माध्यमाची इयत्ता ६ वी वर्गाची तुकडी सुरू होणार असल्याची माहिती संस्थेकडून देण्यात आली.

विद्यार्थ्यांना सैनिकी प्रशिक्षण, शैक्षणिक गुणवत्ता, क्रीडा आणि सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय पातळीवरील सुविधांचा लाभ मिळणार आहे. नव्याने सुरू होणारे सैनिकी विद्यालयातील वर्ग हे पुढील शैक्षणिक वर्षापासून कार्यान्वित होतील, अशी माहिती सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य गिरीश आलुरकर यांनी दिली. या उपक्रमामुळे मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी संधींचे नवे दार खुले झाले आहेत. प्रवेश प्रक्रिया केंद्रीय पद्धतीने राबविण्यात येणार आहे. परीक्षा साधारण जानेवारी महिन्यात होईल. परीक्षेचे सूचनापत्र, जाहिरात, माहिती सार्वजनिक करण्यात येणार आहे. पुढील शैक्षणिक वर्षामध्ये केवळ इयत्ता ६ वीचा वर्ग सुरु होणार असून त्यात मुले व मुली असे ऐकून ६० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. ६० टक्के स्थानिक म्हणजे मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना प्राधान्य तर उर्वरित विद्यार्थी हे संपूर्ण भारतातून प्रवेश घेतील. उच्च दर्जाचे सैनिकी प्रशिक्षण, सोयी-सुविधा व गुणवत्ता इत्यादींचा लाभ मिळणार असल्याने भरतीय सैन्य दलामध्ये जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी ठरणार आहे. येथील सैनीकि विद्यालयाच्या प्रयत्नांना यश आल्याने स्थानिक पातळीवर या निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे.

मागील २९ वर्षांपासून राज्यशासनाच्या सहकार्याने येथे सैनिकी विद्यालय सुरु आहे. या प्रशालेतील अनेक विद्यार्थी देशांच्या संरक्षण क्षेत्रामध्ये मोलाची कामगिरी बजावीत आहेत. केंद्रीय स्कूलच्या स्थापनेमुळे शाळा थेट संरक्षण मंत्रालयाशी जोडली जाईल. त्यामुळे उच्च पातळीवरील मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थ्यांना मिळेल. असा विश्वास संस्कृति संवर्धन मंडळ संचालक रोहित देशमुख यांनी व्यक्त केला.

### लक्ष्मीबाई हातागळे यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ३ डिसेंबर-**



येथील जेष्ठ पत्रकार एल.ए.हिरे यांची मोठी बहिण लक्ष्मीबाई चंद्रकांत हातागळे८० रा.जामदरी ता.भोकर यांचे मंगळवार दि. ०२ डिसेंबर रोजी सकाळी ११वा. अल्पशा अजाराने निधन झाले.

भोकर नगर परिषद निवडणूक वार्ड क्र. ११ मधून हिरे यांची पत्नी निवडणूक रिंगणात होत्या ऐन मतदान सुरु असतांना पाठची बहिण गेल्याची दु:खद घटना हिरे यांना दुपारी कळाली. जड अंतकरणात दु:ख साठवून अंत्यसंस्कारास हिरे उपस्थित झाल्यनंतर सायंकाळी ६ वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. लक्ष्मीबाई यांच्या पश्चात विजय हातागळे, शिक्षक दिगांबर हातागळे,बालाजी हातागळे व सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# श्री संत मन्मथ स्वामी विद्यालयात मुलींना सायकलींचे वाटप

**तभा वृतसेवा**
**मुखेड, दि. ३ डिसेंबर-**

मुखेड तालुक्यातील सांगवी बेनक येथील श्री संत मन्मथ स्वामी माध्यमिक विद्यालयात दि.१ डिसेंबर रोजी सावित्रिच्या लेकींची पायपीट थांबवण्यासाठी बाहेर गावाहून शिक्षणासाठी येणा-या मुलींना सायकलींचे वाटप पुणे येथिल दि इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ लायन्स क्लब्स मॅट्रोपॉलीस यांच्या वतीने श्री संत मन्मथ स्वामी विद्यालयातील बाहेर गावाहून शिक्षणासाठी ये-जा करणाऱ्या मुलींना मोफत ३० सायकलींचे वाटप सांगवी बेनक येथील युवा उद्योजक तथा लायन्स मॅट्रोपॉलीस क्लबसचे नियिजन चेअरमन पांडूरंग भिमराव मस्कले यांच्या




माध्यमातून जन्म गावी शिकलेल्या शाळेला बाहेर गावाहून शिक्षणासाठी ये-जा करणाऱ्या मुलींचे शिक्षणाची गैरसोयीचे होऊनये म्हणुन मोफत सायकल वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष सेवानिवृत्त मुख्याध्यापक बालाजी होनशेट्टे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील लायन्स क्लब मॅट्रोपॉलीस चे अध्यक्ष रामचंद्र माने, वरीष्ठ सदस्य तथा मार्गदर्शक दत्तात्रय गव्हाचे,भरत इंगवले,गुलशन पाल,शंकर गावडे,किरण आल्हाट, पांडुरंग मस्कले,पांडूरंग गव्हाणे, सोमनाथ जगदाळे,लक्ष्मण दंनतराव, सरपंच प्रतिनिधी मिलिंद जोंधळे, चेअरमन विजयकुमार मस्कले, शंकरराव होनशेट्टे,माजी सरपंच सूर्यकांत मस्कले, दत्ता भालके, मुख्याध्यापक एम.आर.मोमिण, एकनाथ डुमणे, बालाजी करडखेले,शाम मस्कले, बालाजी क्यादापुरे ,भागवत कपाळे उद्देश चौधरी,भैयासाहेब गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती साविञिबाई फुले यांच्या प्रतिमेस दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष रामचंद्र माने,गुलशनपाल,भरत इंगवले, शंकर गावडे,किरण आल्हाट व येथील भुमिपुत्र पांडुरंग मस्कले यांनी आपले विचार मांडले तर अध्यक्षीय समारोप बालाजी होनशेट्टे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्तावना दत्तात्रय कांबळे यांनी केले तर आभार मुख्याध्यापक एम.आर.मोमीण यांनी मानले,या प्रसंगी शाळेतील माजी विद्यार्थी मारोती आचमारे, बालाजी क्यादापुरे,मेघराजा बळते,वैभव होनशेट्टे, शाम मस्कले, माधव मस्कले,बाळू हिप्परगे,गजानन मस्कले यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापक एम.आर.मोमीण, के. जि.केसे, डी.जि.कांबळे, एम.एस. सावरगावे,गजानन होनशेट्टे,मालती चमकुरे, संगिता गित्ते, शिवानी होनशेट्टे, विश्वास चमकुरे, सुभाष होनशेट्टे, गणेश मस्कले, विजय घाळे यांनी परिश्रम घेतला.